cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–७५ | गुरूवार दि.०४ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### बळीराजाला कायमचा दिलासा हवा

राज्य सरकारने जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रासाठी मोठा निर्णय मानला जात आहे. सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणाऱ्या या योजनेमुळे लाखो शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा मिळणार आहे. दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान आणि 'वन टाईम सेटलमेंट'ची तरतूद यामुळे या योजनेचे स्वरूप व्यापक आहे.

# कर्जमाफीसाठी शासनाचे भाराभर निकष!

## कर्जमाफीचा जीआर जारी; पात्रता, मुदत आणि लाभार्थी कोण?

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली असून पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. यासोबतच नियमितपणे पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला असून लाभार्थी शेतकऱ्यांसाठी आवश्यक निकष निश्चित करण्यात आले आहेत.**

शासनाच्या निर्णयानुसार, योजनेचा लाभ देताना वैयक्तिक शेतकरी हा निकष ग्राह्य धरण्यात येणार आहे. मात्र, ज्या



### उपसमितीची स्थापना आणि शेतकऱ्यांना दिलासा...

कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी तसेच आवश्यकतेनुसार निकषांमध्ये बदल करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. राज्यातील वाढत्या कर्जबाजारीपणाच्या पार्श्वभूमीवर शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. कर्जमाफीबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ देण्यात येत असल्याने प्रामाणिक परतफेडीला चालना मिळणार असल्याचे कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे, त्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ही योजना राष्ट्रीयकृत बँका, खासगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच प्राथमिक कृषी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### ममतादीदीला धक्का ५८ आमदारांनी वेगळा गट

कोलकत्ता : पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या टीएमसीमध्ये फूट पडली आहे. ५८ बंडखोर आमदारांनी पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेल्या आमदार ऋतब्रता बॅनर्जी यांना विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून घोषित केले. त्यांनी आज (३ जून) विधानसभा अध्यक्ष रतिंद्र बोस यांची भेट घेऊन पाठिंब्याचे पत्र सादर केले. बंगालच्या निवडणुकीत टीएमसीने ८० जागा जिंकल्या होत्या. ५८ आमदारांच्या बंडानंतर, ममता बॅनर्जी यांच्याकडे आता फक्त २२ आमदार उरले आहेत. बंडखोर गटाने आपल्या पत्रात ममता बॅनर्जी यांना पक्षाध्यक्ष म्हटले असले तरी, ते अभिषेक बॅनर्जी यांचे नेतृत्व आणि विधिमंडळ पक्षाशी संबंधित निर्णय स्वीकारत नाहीत.

### कुवैतच्या विमानतळावरच इराणचा हल्ला

कुवैत : शस्त्रसंधीमुळे काही काळ शांत असलेल्या पश्चिम आशियातील युद्धाचा ज्वर पुन्हा वाढताना दिसत आहे. अमेरिकेकडून हल्ले करण्यात आल्यानंतर खवळलेल्या इराणने आता शेजारील देशांनाच लक्ष्य करणे सुरू केले असून, कुवैतच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरच मिसाईल आणि ड्रोन्स डागले आहेत. या हल्ल्यानंतर विमानतळावर आणीबाणी घोषित करण्यात आली.कुवैत आंतरराष्ट्रीय विमानतळावर इराणने मिसाईल हल्ला केला. अधिका–यांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानतळाच्या टर्मिनल–१ वर हा हल्ला करण्यात आला. मिसाईल आणि ड्रोन विमानतळावर डागण्यात आले. या हल्ल्यात अनेक लोक जखमी झाले आहेत. त्याचबरोबर विमानतळाच्या इमारतीचेही मोठे नुकसान झाले आहे. या घटनेनंतर विमानांची ये–जा तात्काळ थांबवण्यात आली.

### तामिळनाडूत १३ जिल्ह्यांमध्ये महिला राज

चेन्नई :तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि टीव्हीके प्रमुख सी. जोसेफ विजय यांनी महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देत राज्यातील ३० जिल्ह्यांपैकी १३ जिल्ह्यांमध्ये महिला आयएएस अधिका–यांची जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. काही जिल्ह्यांमध्ये प्रथमच महिला जिल्हाधिका–यांची नियुक्ती करण्यात आल्याने या निर्णयाची राज्यभर चर्चा होत आहे.विधानसभा निवडणुकीदरम्यान महिलांना अधिक सुरक्षित वातावरण देण्याचे आश्वासन देणा–या विजय यांनी सत्तेत आल्यानंतर प्रशासनात अनेक महत्त्वाचे बदल सुरू केले आहेत. महिला आयएएस अधिका–यांवरील त्यांचा विश्वास हा महिला सक्षमीकरणाबरोबरच महिलांच्या सुरक्षेबाबत ठोस संदेश देण्याचा प्रयत्न मानला जात आहे.कल्लाकुरिची जिल्ह्यात आयएएस अधिकारी पद्मजा या पहिल्या महिला जिल्हाधिकारी ठरल्या आहेत. त्यांनी मंगळवारी पदभार स्वीकारला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०३ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: २०१.०० क्विंटल | | |
| २,२०१ | २,५०० | २,३१९ |
| ज्वारी/हायब्रिड: १४८.०० क्विंटल | | |
| १,८०१ | ४,०४० | २,५९७ |
| मका/लोकल: ३०.०० क्विंटल | | |
| २,०१८ | २,०१८ | २,०१८ |
| तूर : १४.५० क्विंटल | | |
| ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| उडीद : -- क्विंटल | | |
| -- | -- | -- |
| बाजरी: ५७.०० क्विंटल | | |
| २,०९० | २,४८० | २,२७२ |
| मुग: ८.०० क्विंटल | | |
| -- | -- | -- |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | | |
| ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| हरभरा: २१.०० क्विंटल | | |
| १,८५० | २,०४१ | १,९४५ |

### भव्य आयोजन नसतानाही लोकनेत्याच्या अभिवादनासाठी गोपीनाथ गडावर मोठी गर्दी!

# दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा–पंकजा मुंडे

परळी वै.। प्रतिनिधी


**लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती दिनानिमित्त आज गोपीनाथ गडावर दर्शनासाठी सकाळपासूनच गर्दी झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत आवाहनाला प्रतिसाद म्हणून भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित नसतानाही लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. याप्रसंगी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरणपूरक लोकसहभागाला साद घालणारे भाषण करत वृक्षारोपण,जैविक व नैसर्गिक शेती ,स्वाभिमान, समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, आणि शेतकरी हितासाठी रचनात्मक काम असे संकल्प जाहीर केले. सर्वांनी हे संकल्प पूर्ण करावे आणि पर्यावरणीय सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी योगदान द्यावे असे सांगत दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा असे आवाहन केले.**





लोकनेते मुंडे साहेब यांच्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम आज गोपीनाथगडावर अत्यंत साधेपणाने झाला. यावेळी ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, त्यांच्या मातोश्री प्रज्ञाताई, जावई गौरव खाडे , नातू आर्यमन पालवे,अगस्त्य खाडे, बंधू अजय मुंडे, रामेश्वर मुंडे यांसह मुंडे कुटुंबियांनी समाधीचे दर्शन घेतले.त्याबरोबर मुंडे साहेबांना आवडणाऱ्या पदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. ▶▶ पान २ वर

# जून, जुलैमध्ये इंधनाचे दर आणखी वाढणार



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अमेरिका आणि इराणमधील तणाव पुन्हा वाढल्याने आखातात पुन्हा एकदा युद्धाचे ढग जमू लागले आहेत. त्यापार्श्वभूमीवर जागतिक तेल कंपन्यांनी काही आठवड्यांत तेलाच्या किमतींमध्ये वाढ होण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे अगोदरच कच्च्या तेलाचे दर गगनाला भिडले असतानाच या नव्या इशा–यामुळे जगाची चिंता वाढली आहे.

सुमारे दोन महिन्यांपूर्वी, अमेरिकन गुंतवणूक बँक जेपी मॉर्गनने एक विश्लेषण प्रसिद्ध केले होते. ▶▶ पान २ वर

# सुट्ट्या संपणार १५ जूनलाच शाळेत किलबिलाट

पुणे । प्रतिनिधी

**युद्धजन्य परीस्थितीमुळे वाढलेले पेट्रोल–डिझेलचे भाव आणि उन्हाचा वाढता चटका यामुळे यंदा शाळा उशिरा सुरू होणार असल्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. तसेच, शाळा ऑनलाइन सुरू करण्यात येणार असल्याचेही बोलले जात होते. परंतु, असे काहीही न होता यंदा ५ जूनपासूनच शैक्षणिक वर्षांचा शुभारंभ आणि शाळेत किलबिलाट होणारअसल्याचे शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्यांनी सांगितले .**




अधिका–यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या राज्यभरातील शाळांना २ मेपासून उन्हाळी सुटी सुरू झालेली आहे. राज्यातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुटीच्या कालावधीमध्ये एकवाक्यता आणि सुसंगती आणण्यासाठी सूचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत.त्यानुसार शैक्षणिक वर्षाचा श्रीगणेशा १५ जूनपासूनच करण्यात येणार आहे. यामध्ये ▶▶ पान २ वर

# मुंबईतील ऐतिहासिक एअर इंडिया इमारत शासनाच्या ताब्यात

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राची राजधानी मुंबईच्या नरिमन पॉईंट येथील ऐतिहासिक 'एअर इंडिया' इमारतीचे महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरण झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना



आवश्यक सूचना दिल्या. यावेळी मंत्री भोसले यांनी शासकीय कार्यालयांचे स्थलांतर करण्यापूर्वी इमारतीची सखोल स्ट्रक्चरल तपासणी करण्यात यावी तसेच आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतरच अंतर्गत सजावट व इतर विकासकामे हाती घेण्यात यावीत, ▶▶ पान २ वर

# संत तुकोबांच्या वारीचं वेळापत्रक जाहीर

पुणे । प्रतिनिधी

मान्सूनच्या पहिल्या पावसानंतर वारकरी भक्तांना वेध लागते ते पंढरीच्या पांडुरंगाचे, पंढरीच्या वारीची उत्सुकता आणि विठ्ठल भेटीच्या ओढीने वारकरी आषाढी एकादशीची वाट पाहतात. यंदा आषाढी एकादशी २५ जुलै २०२६ रोजी होत असल्याने आत्तापासूनच पंढरीच्या वारीचं नियोजन केलं जात आहे. त्यातच, संत तुकोबांच्या वारीचं वेळापत्रक जाहीर झालं असून यंदा ७ जुलैपासून तुकोबांची पालखी पंढरीकडे प्रस्थान करणार आहे. अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या ▶▶ पान २ वर

### परळीतील जमीन घोटाळा: मुख्यमंत्र्याकडून दखल

# जिल्हाधिकाऱ्यांनी लावली चौकशी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील तीन गावांमध्ये ४३ गुंठ्यांमध्ये अस्तित्वात नसलेल्या २६२ एकर जमिनीवर बोगस शेतकऱ्यांची नावे लावण्यात आली. या शेतकऱ्यांना वेगवेगळ्या प्रकारचा लाभ देखील देण्यात आला. परंतु या बोगस लोकांना लाभ देणे तत्वतः चुकीचे होते. याबाबतची तक्रार मुख्यमंत्र्यांकडे गेल्यानंतर त्यांनी लगेच सहकार विभागाच्या प्रधान सचिवाला ही तक्रार सोपवली असून बोगस कर्जदार कर्जमाफी मध्ये येणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान काल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे सहदेखील या संदर्भात चर्चा झाली असून त्यांनी देखील उपविभागीय अधिकारी यांच्याकडे याबाबतची चौकशी दिली आहे. उपविभागीय अधिकारी आता ही नावे आली कशी ? यावर चौकशी करून महसूल प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी प्रस्ताव दाखल करतील. यात तलाठी, मंडळ अधिकारी आणि तपासणी ▶▶ पान २ वर

# मोदी सरकारने देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त केली

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

आखातातील युद्ध आणि जागतिक आर्थिक दबावाच्या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आपल्या सोन्याच्या साठ्यातील काही भाग विकल्याचा दावा 'ब्लूमबर्ग इकॉनॉमिक्स'ने केला आहे. या अहवालाचा हवाला देत काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. मोदी



सरकारच्या धोरणांमुळे देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

'ब्लूमबर्ग' इकॉनॉमिक्स'चे वरिष्ठ अर्थतज्ज्ञ अभिषेक गुप्ता यांच्या विश्लेषणानुसार, २२ मे पर्यंतच्या अवघ्या दोन आठवड्यांच्या कालावधीत ▶▶ पान २ वर

# पोलीस अधीक्षक सुट्टीवर: परस्परविरोधी खोट्या गुन्ह्यांचे सत्र बीडमध्ये पुन्हा सुरू





बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि गुन्हेगारीला लगाम बसावा यासाठी धडक कारवाई करणारे बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत हे नुकतेच प्रशिक्षणासाठी काही दिवसांच्या रजेवर गेले आहेत. मात्र, ते रजेवर जाताच**



**बीडमध्ये पुन्हा एकदा 'पहिले पाढे ५५' अशी स्थिती निर्माण झाली असून, राजकीय व वैयक्तिक द्वेषातून परस्परविरोधी खोटे गुन्हे दाखल करण्याचे जुने फंड पुन्हा डोके वर काढू लागले आहे. संवेदनशील बीड जिल्ह्यात पोलीस प्रमुखांच्या गैरहजेरीत प्रशासनावर राजकीय दबाव तंत्राचा वापर तर होत नाही ना? असा गंभीर प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.**







बीड जिल्हा हा राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील मानला जातो. मागील काळामध्ये मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्या तील कायदा आणि सुव्यवस्था पूर्ण ढासळल्याचे चित्र राज्यभर निर्माण झाले होते याच संवेदनशीलतेचा विचार करून राज्य शासनाने नवनीत कावत यांची बीडचे पोलीस अधीक्षक म्हणून खास नियुक्ती केली होती. कावत यांनी पदभार स्वीकारल्यापासून बीडमधील गुन्हेगारीवर आणि खोट्या तक्रारींच्या सत्रावर मोठा वचक निर्माण झाला होता. ते कर्तव्यावर असेपर्यंत ▶▶ पान २ वर

### पुन्हा 'त्या' काळात लोटणार का?

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी निर्माण केलेला धाक त्यांच्या रजेच्या काळात धुळीस मिळवण्याचा प्रयत्न काही घटकांकडून सुरू असल्याचे यावरून स्पष्ट होते. खोटे गुन्हे दाखल करून पोलीस प्रशासनाचा वेळ आणि ऊर्जा वाया घालवणाऱ्या अशा प्रवृत्तींवर आता पोलीस प्रशासन काय कडक कारवाई करणार, की पोलीस अधीक्षक परतण्याची वाट पाहणार? याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### "धनंजय देशमुख चुकीच्या ट्रॅकवर

मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर संपूर्ण महाराष्ट्र हळहळला या हत्याकांडातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी सर्व समाज देशमुख कुटुंबीयांच्या पाठीशी उभा राहिला त्यासाठी संतोष देशमुख यांची बंधू धनंजय देशमुख न्यायासाठी पुढे आले त्यांच्यावर सर्वांनी विश्वास ठेवला परंतु नुकत्याच झालेल्या फिर्यादीमुळे त्यांनी दिलेली फिर्याद खोटी ठरल्याचा शिक्का पोलिसांनी मारल्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवणारा सर्व समाज शंकेने पाहू लागला ते चुकीच्या ट्रॅक वर जात असल्याच्या भावना सर्वसामान्य मधून उमटत आहेत.

### "पोलिसांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह? की राजकीय दबाव?

गुन्हे खोटे असल्याचे तपासात सिद्ध झाले असले, तरी या प्रकरणाने पोलीस प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर आणि कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. जर हे गुन्हे खोटे होते, तर ते सुरुवातीला दाखलच कसे करून घेण्यात आले?पोलीस अधिकाऱ्यांनी तक्रारीची प्राथमिक शहानिशा का केली नाही?जिल्हा पोलीस प्रमुखांच्या रजेचा फायदा घेऊन स्थानिक अधिकाऱ्यांवर कोणता अदृश्य दबाव आणला गेला होता का? बीडमध्ये पोलीस दल कायद्यानुसार चालते की कोणाच्या दबावाखाली?असे अनेक अस्वस्थ करणारे प्रश्न आता बीडकर जनतेच्या मनात निर्माण होत आहेत.

cmyk

cmyk



## अग्रलेख

# बळीराजाला कायमचा दिलासा हवा ; तात्पुरती मलमपट्टी नको

राज्य सरकारने जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रासाठी मोठा निर्णय मानला जात आहे. सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणाऱ्या या योजनेमुळे लाखो शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा मिळणार आहे. दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान आणि 'वन टाईम सेटलमेंट'ची तरतूद यामुळे या योजनेचे स्वरूप व्यापक आहे. मात्र या निर्णयाकडे केवळ राजकीय लोकप्रियतेच्या चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. याचे आर्थिक, सामाजिक आणि कृषी क्षेत्रावरील दूरगामी परिणाम तपासणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील शेती गेल्या अनेक वर्षांपासून नैसर्गिक आपत्ती, हवामान बदल, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे संकटात आहे. अशा परिस्थितीत कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणे ही शासनाची जबाबदारीच आहे. अनेक शेतकऱ्यांसाठी ही योजना नव्याने उभे राहण्याची संधी ठरणार आहे. विशेषतः ज्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांना संपूर्ण कर्जमुक्ती मिळणार असल्याने ते पुन्हा पीककर्ज घेण्यास पात्र ठरतील. शेतीच्या चक्राला गती देण्यासाठी हा सकारात्मक पैलू आहे.

परंतु प्रश्न असा आहे की, कर्जमाफी हा शेती संकटावरील कायमस्वरूपी उपाय आहे का? महाराष्ट्राने यापूर्वीही अनेक वेळा कर्जमाफी योजना राबवल्या आहेत. प्रत्येक वेळी शेतकऱ्यांना दिलासा मिळाला, परंतु काही वर्षांत पुन्हा कर्जबाजारीपणाची समस्या उभी राहिली. कारण संकटाचे मूळ कर्जात नसून शेतीच्या अस्थिर उत्पन्नात आहे. जोपर्यंत उत्पादन खर्च आणि उत्पन्न यातील तफावत कमी होत नाही, तोपर्यंत कर्जमाफीचे चक्र सुरूच राहणार आहे. या योजनेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे आर्थिक भार. राज्याची आर्थिक स्थिती आधीच चिंताजनक आहे. महसुली तूट ४० हजार कोटी रुपयांहून अधिक असून वित्तीय तूट दीड लाख कोटी रुपयांच्या आसपास आहे. अशा परिस्थितीत ३६ हजार कोटी रुपयांहून अधिकचा अतिरिक्त भार उचलणे ही सोपी बाब नाही. सरकारने यासाठी अर्थसंकल्पीय तरतूदही केलेली नाही. परिणामी विकासकामे, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील खर्चावर दबाव येण्याची शक्यता आहे. अल्पकालीन राजकीय लाभासाठी घेतलेले निर्णय दीर्घकालीन आर्थिक शिस्तीला धक्का देऊ शकतात.

कर्जमाफीच्या धोरणावर सातत्याने एक टीका केली जाते ती म्हणजे 'नैतिक जोखीम' नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनात अन्यायाची भावना निर्माण होण्याचा धोका असतो. सरकारने यासाठी ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर लाभाची तरतूद केली असली, तरी दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीच्या तुलनेत हा लाभ मर्यादित वाटू शकतो. भविष्यात कर्जमाफीची अपेक्षा वाढल्यास काही कर्जदार जाणूनबुजून कर्जफेड टाळण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचा परिणाम बँकांच्या कर्जवाटप संस्कृतीवरही होऊ शकतो.

राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर हा निर्णय ग्रामीण भागातील असंतोष कमी करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट दिसते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अधिक चर्चेत आला आहे. जरी सरकारने हा निर्णय शेतकरीहितासाठी असल्याचा दावा केला असला, तरी त्यामागील राजकीय गणित नाकारता येणार नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात कर्जमाफी हा नेहमीच प्रभावी निवडणूक मुद्दा राहिला आहे.

खरे तर महाराष्ट्राला आता केवळ कर्जमाफी नव्हे तर शेतीसाठी दीर्घकालीन धोरणाची आवश्यकता आहे. हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी, पीकविमा व्यवस्थेतील सुधारणा, सिंचन सुविधांचा विस्तार, कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना, बाजारपेठेपर्यंत थेट प्रवेश आणि उत्पादन खर्च कमी करणाऱ्या उपाययोजना यांवर अधिक भर देणे गरजेचे आहे. अन्यथा प्रत्येक काही वर्षांनी नवीन कर्जमाफी जाहीर करण्याची वेळ येत राहील.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही लाखो शेतकऱ्यांसाठी नक्कीच दिलासादायक आहे. मात्र ती शेती संकटावरील अंतिम उत्तर नाही. सरकारने या योजनेला तात्पुरता उपाय मानून शेतकऱ्यांना कायमस्वरूपी आर्थिक स्थैर्य देणाऱ्या धोरणांवर भर दिला पाहिजे. अन्यथा आजची कर्जमाफी उद्याच्या नव्या कर्जसंकटाची नांदी ठरण्याची भीती कायम राहील. महाराष्ट्राला सध्या कर्जमाफीपेक्षा अधिक गरज आहे ती शाश्वत कृषी सुधारणांची आणि वित्तीय शिस्तीची.

# आचारसंहिता कालावधीतही बॅनरबाजीचा सुळसुळाट; मुख्याधिकारी शैलेश फणसे यांचे दुर्लक्ष?

## नगरपरिषद प्रशासन मुंबईतील घाटकोपरसारख्या दुर्घटनेची वाट पाहतंय काय?

**बीड । प्रतिनिधी**

**विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीची आचारसंहिता धाराशिव, लातूर आणि बीड जिल्ह्यात लागू झाली असून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत विविध निर्बंध लागू करण्यात आले आहेत. १८ मे ते २५ जून २०२६ या कालावधीत नियमभंग करणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.**

निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यानंतर मार्गदर्शक सूचनांनुसार नगरपरिषद प्रशासनाने अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर, पोस्टर्स हटविणे, सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले राजकीय फलक काढणे, तसेच शासकीय इमारती, सार्वजनिक भिंती, रस्ते, पदपथ, बसस्थानके, उद्याने व क्रीडांगणे आदी ठिकाणी विशेष पथकाद्वारे नियमित पाहणी करणे आवश्यक आहे. याबाबतचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा प्रशासनाला सादर करणेही बंधनकारक आहे. मात्र बीड शहरात या नियमांची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे. गेल्या दोन दिवसांत वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे अनेक घरांवरील पत्रे उडून गेली, तर मोठमोठी झाडेही कोसळली. असे असतानाही शहरातील विविध चौकांमध्ये तसेच नगरपरिषद आणि इतर शासकीय विभागांच्या जागांवर मोठ्या प्रमाणात लोखंडी सांगाड्यांचे होर्डिंग्ज उभे असल्याचे चित्र आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नगरपरिषद तसेच कुष्ठरोग विभागाच्या परिसरातही धोकादायक स्वरूपाचे अनधिकृत लोखंडी सांगाडे उभारण्यात आले आहेत. अधिकृतरीत्या केवळ ८० होर्डिंग्जना परवानगी असताना शहरात सुमारे ६०० हून अधिक अनधिकृत होर्डिंग्जचे सांगाडे उभारण्यात आल्याचा दावा डॉ. ढवळे यांनी केला आहे.



### मुंबईतील घाटकोपर दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याची भीती

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून वादळी वाऱ्यांमुळे हे अवाढव्य लोखंडी सांगाडे कोसळून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुंबईतील घाटकोपर येथे होर्डिंग कोसळून १७ जणांचा मृत्यू झालेल्या दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी १७ मे २०२४ रोजी सर्व संबंधित नगरपरिषदांना विनापरवाना होर्डिंग्ज, बॅनर व फलकांचे लोखंडी ढाचे २४ तासांत हटविण्याचे आदेश दिले होते. अन्यथा संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या होत्या. तरीदेखील बीड नगरपरिषद प्रशासनाकडून या आदेशांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, 'मुंबईतील घाटकोपरसारख्या दुर्घटनेची वाट प्रशासन पाहत आहे काय?'' असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

# भूमी अभिलेखचा गलथान कारभार पुन्हा चर्चेत

**बीड । प्रतिनिधी**

**मौजे नामलगाव येथे शेतजमिनीच्या मोजणीदरम्यान भूमी अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांशी अरेरावीची व दादागिरीची भाषा वापरल्याची गंभीर तक्रार संबंधित शेतकऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली होती. या तक्रारीची दखल घेत उपसंचालक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्देशानुसार उपअधीक्षक भूमी अभिलेख यांनी संबंधित दोन्ही कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून सात दिवसांच्या आत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. निर्धारित मुदतीत समाधानकारक खुलासा न केल्यास शासन नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा नोटीसमध्ये देण्यात आला आहे.**

दरम्यान, भूमी अभिलेख विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिक व शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. जिल्ह्यात शेती व जागांच्या सीमावादांमध्ये सातत्याने वाढ होत असून त्यासाठी विभागातील त्रुटीपूर्ण नोंदी, विलंबित प्रक्रिया आणि अभिलेखांच्या जतनातील हलगर्जीपणा कारणीभूत असल्याचा आरोप केला जात आहे. अनेक वर्षांपासूनचे महत्त्वाचे दस्तऐवज, जुने अभिलेख व नकाशे उपलब्ध नसल्याच्या तक्रारी वारंवार पुढे येत असून त्यामुळे जमीनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही प्रकरणांमध्ये अभिलेखांतील त्रुटी आणि दस्तऐवजांच्या अनुपलब्धतेचा फायदा घेऊन शेतकऱ्यांच्या जमिनींवर वाद निर्माण करण्याचे प्रकार वाढल्याचीही चर्चा आहे. शेतकऱ्यांना सेवा देण्यासाठी असलेल्या विभागातील काही कर्मचाऱ्यांकडून उलट अरेरावीची भाषा वापरली जात असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नामलगाव येथील प्रकारामुळे भूमी अभिलेख विभागाचा कारभार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला असून संबंधित कर्मचाऱ्यांवर केवळ नोटीसची औपचारिकता पार पडणार की प्रत्यक्षात कठोर कारवाई होणार, याकडे जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## गोरख कटारे यांचे निधन

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



दिंद्रुड (ता.माजलगाव) येथील जेष्ठ नागरिक स्व. गोरखनाथ (भाऊ) पुंजाजी कटारे (वय - ९७ वर्षे) यांचे बुधवारी (दि.०३ जुन) सायंकाळी सहा वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. शिवाजी कटारे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी कटारे यांचे ते वडील होत.

# परळी नगरपरिषदेत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना अभिवादन

**परळी वै.। प्रतिनिधी**

**दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या बाराव्या स्मृतीदिनानिमित्त परळी वैजनाथ नगर परिषद कार्यालय येथे प्रतिमा पूजन करुन लोकनेत्याला विनम्र अभिवादन करण्यात आले. दिवंगत गोपीनाथराव मुंडे हे लोकोत्तर लोकपुरूष आहेत. त्यांच्यासारखा लोकनेता पुन्हा होणे नाही. वंचित, उपेक्षित घटकांच्या न्यायासाठी अविरत संघर्ष करणारे ते अव्दितीय लोकनेते होते अशा शब्दात नगराध्यक्ष पद्मश्री धर्माधिकारी यांनी अभिवादन केले.**



परळी न.प. कार्यालय येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या बाराव्या स्मृती दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका त्याचबरोबर प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्या लाडक्या लोकनेत्यास पुष्प अपर्ण करुन विनम्रभावे अभिवादन केले. यावेळी नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर खान राजाखान पठाण, मा.नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, रा.कॉ. गटनेते वैजनाथ सोळंके, भाजपा गटनेते तथा बांधकाम सभापती पवन मुंडे, निळकंठ चाटे, राजाभैय्या पांडे,योगेश मेनकुदळे, महेंद्र रोडे, डॉ. पुजा प्रितेश तोतला, अर्चना रोडे, जयराज देशमुख, भिमा डावरे, आश्विन आघाव, सुशिल हरंगुळे, संपत बळवंत, प्रणव मराठे, शेख मोहशीन, योगेश पांडकर, नगरसेवक बब्बु, पिंटु मुरकुटे, रमेश पवार, जयपाल लाहोटी,अनंत इंगळे, प्रितेश तोतला, भागवत गित्ते आदींसह न.प. अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुपारी गोपीनाथगडावरुन संकल्प; सायंकाळी प्रत्यक्ष कृतीला सुरूवात

## ना.पंकजाताई मुंडेंचा सेंद्रीय शेतीचा संकल्प ; स्वत: ट्रॅक्टर चालवत केली नांगरणी

**परळी वै.। प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे हया आपल्या कार्यपद्धतीतून नेहमी आगळेवेगळे संकल्प करत असतात, असाच एक संकल्प त्यांनी आज लोकनेते मुंडे साहेबांच्या स्मृतीदिनी केला आणि सायंकाळी प्रत्यक्ष कृतीला सुरूवातही केली. सेंद्रीय शेती करण्यासाठी त्यांनी शेतात स्वतः ट्रॅक्टर चालवत नांगरणी केली, त्यांच्या या अनोख्या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.**



लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या आजच्या स्मृती दिनानिमित्त पर्यावरण पूरक विविध संकल्प ना.पंकजाताई मुंडे यांनी जाहीर केले. गोपीनाथगडावरील कार्यक्रमात वृक्षारोपण व वृक्ष वितरण करुन या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या अनुषंगाने जैविक व नैसर्गिक शेतीला प्राधान्य दिले जावे यासाठी मी स्वत: सेंद्रीय शेती करणार असल्याची घोषणा त्यांनी दुपारी केली आणि लगेचच प्रत्यक्ष अंमलबजावणी करत सायंकाळी देशमुख टाकळी येथील आपल्या स्वत:च्या शेतात सेंद्रीय शेती उपक्रमाचा प्रारंभ केला. यावेळी मुलगा आर्यमन सोबत स्वत: ट्रॅक्टर चालवत नांगरणी केली. पर्यावरण संवर्धनासाठी ना. पंकजाताई मुंडे यांनी विविध संकल्प सर्वांसमोर मांडले. यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे आवाहनही त्यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ''एक पेड माँ के नाम'' या उपक्रमाच्या धर्तीवर ''एक पेड पिता के नाम'' उपक्रम राबविण्याचे त्यांनी आवाहन केले. शेती आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी नैसर्गिक शेतीला प्राधान्य दिले पाहिजे तरच जमिनीचा पोत कायम राहील अन्यथा रासायनिक खताच्या अतिरेकी वापराने जमिनी नापिक होवुन जाण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. यासाठी सेंद्रीय शेती हाच उत्तम पर्याय असुन अधिकाधिक शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेतीकडे वळले पाहिजे. राज्याचे माजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या विचाराची प्रेरणा यामागे आहे.हा उद्देश समोर ठेवून आपण स्वत: शेतकऱ्यांच्या जीवनाशी एकरुप होवुन प्रत्यक्ष शेती करणार असल्याचे म्हटले. यावेळी त्यांच्यासमवेत मा.खा.डॉ. प्रितमताई मुंडे, आर्यमन पालवे, अगस्त्य खाडे आदी उपस्थित होते. दरम्यान, यावेळी ना.पंकजाताई मुंडे व डॉ. प्रितमताई मुंडे यांनी आपल्या शेतातील बांधांवर वृक्षारोपणही केले.

# पान १ वरून...

## कर्जमाफीसाठी शासनाचे

पतपुरवठा सहकारी संस्थांनी स्वतःच्या निधीतून वितरित केलेल्या कर्जांनाही लागू राहणार आहे. त्यामुळे राज्यातील मोठ्या संख्येने शेतकरी या योजनेच्या कक्षेत येण्याची शक्यता आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक राहणार आहे. तसेच केंद्र सरकारच्या ॲग्रीस्टॅक आधार सामग्री मंचावर शेतकऱ्यांची नोंदणी करणेही अनिवार्य करण्यात आले आहे. या माध्यमातून लाभार्थी शेतकऱ्यांची पडताळणी आणि लाभ वितरणाची प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. यासाठी सहकार व पणन विभागाकडून स्वतंत्र मार्गदर्शक सूचना जारी केल्या जाणार आहेत. पात्र शेतकऱ्यांची माहिती संकलित करणे, पडताळणी करणे आणि लाभ मंजुरीची प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. शासनाच्या निर्णयानुसार, पीक कर्ज तसेच पुनर्गठन किंवा फेरपुनर्गठन करून मध्यम मुदत कर्जात रूपांतरित करण्यात आलेले आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात येणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांच्यासाठी शासनाने एकवेळ समझोता (वन टाइम्स सेटलमेंट ) योजनेची तरतूद केली आहे. अशा शेतकऱ्यांना उर्वरित कर्जाची रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत परतफेड करण्याची मुदत देण्यात आली आहे. संबंधित शेतकऱ्यांनी ही रक्कम भरल्यानंतरच त्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

-------------

## जून, जुलैमध्ये इंधनाचे

त्यात जगातील कच्च्या तेलाचा किमान साठा संपायला किती वेळ लागेल? आणि त्याचा जगावर काय परिणाम होईल, याची माहिती देण्यात आली होती. त्यानुसार बाजारात अब्जावधी बॅरल तेल उपलब्ध असले तरी, जर उपलब्ध साठा खूप कमी झाला आणि तेल वाहूक खंडीत झाली तर संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडेल, असा अंदाज वर्तवण्यात आला होता.आता आणखी २-३ आठवड्यात तेल इतके महाग होईल की ते सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाईल, असा धोक्याचा इशारा जगभरातील तेल कंपन्यांनी दिला आहे. .जून आणि विशेषत: जुलैमध्ये किमती वाढतील. या इशा-यामुळे जगाची चिंता वाढली आहे की, युद्ध संपवण्यासाठी करार झाला तरी, तेलाच्या किमती अनेक महिने वाढलेल्या राहू शकतात. तसेही, असा करार सध्या दृष्टिपथात आहे. या संघर्षामुळे जागतिक बाजारातून दररोज १२ ते १३ दशलक्ष बॅरल तेलाचा पुरवठा आधीच कमी झाला आहे. इराण युद्ध ख-या अर्थाने संपत नाही आणि होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे सामान्य होत नाही, तोपर्यंत जागतिक तेलसाठा दररोज अंदाजे १० ते १४ दशलक्ष बॅरलच्या दराने कमी होत राहील.

---------------

## दोन घास कमी खा, पण

याप्रसंगी आयोजित भजनाच्या कार्यक्रमात ना पंकजाताई मुंडे यांनी कुटुंबासह सहभाग घेतला. कार्यक्रमास महंत राधाताई सानप, आ.नमिता मुंदडा, माजी मंत्री बदामराव पंडित, बाळदादा पवार, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हाईस चेअरमन रमेश कराड, भाजप नेते गणेश हाके, प्रवीण घुगे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, बाजीराव धर्माधिकारी, माधवराव निर्मळ,योगेश क्षीरसागर , प्रा.लक्ष्मण हाके, गायताई कराड,, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी न. प. गटनेते वैजनाथ सोळंके,, भाजप गटनेते प्रा.पवन मुंडे, भाजपा प्रदेश प्रवक्ता राम कुलकर्णी, आदींसह बीड जिल्ह्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधी भाजप पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, एक तप उलटले तरी साहेबांच्या आठवणी विसरता येत नाहीत. मुलगी म्हणून माझ्या वाट्याला आलेल्या सर्व जबाबदाऱ्या आणि कर्तव्य मी मुंडे साहेबांना शोभेल अशा पद्धतीने पार पाडली आहेत. स्वाभिमान जपत, सामाजिक सलोख्यासाठी जाती-धर्मांच्या भिंती भेदून अठरापगड जाती धर्मासाठी प्रामाणिकपणे काम करत आहे. बारा वर्षे झाली, पण मुंडे साहेबांचे पुण्यस्मरण करताना तुमचे निरपेक्ष प्रेम बघून आजही माझा प्रत्येक श्वास जनतेकडे गहाण ठेवून काम करत आहे. स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या निधनानंतर तुमची व माझी कधीही भरून न येणारी अशी हानी झालेली आहे. तीन जून रोजी याच ठिकाणी मी माझ्या हाताने माझा पिता आणि आपला नेता यांना अखेरचा निरोप दिला आहे. आजही मला आणि माझ्या आईला २ जूनची भयाण रात्र आठवते. साहेबांनी अगदी शून्यापासून संघर्षमय प्रवास केला. ''आयुष्य लांब असण्यापेक्षा मोठे असावे,'' याप्रमाणे आपल्या कर्तुत्वाने आज साहेबांचे स्थान घराघरातील देव्हाऱ्यात आहे असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना समाजासाठी झटण्याचा संदेश दिला.माझा प्रत्येक श्वास वंचित, पीडित आणि गरजूंसाठी आहे.आपल्या पेक्षा दुर्बल असलेल्या व्यक्तींना मदतीचा हात द्या. दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने जगा, असा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला. पर्यावरणासमोरील आव्हानांचा उल्लेख करत पंकजाताई मुंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या ' एक पेड मॉ के नाम' उपक्रमाबरोबरच ''एक पेड़ बाप के नाम'' हा संकल्प राबविण्याचे आवाहन केले. प्रत्येकाने किमान ११ झाडे लावून त्यांचे संवर्धन करावे, प्रत्येकानी कौटुंबिक ,सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमात वृक्षारोपण करावे आणि त्याचे संवर्धन करावे असे त्यांनी सांगितले. या संकल्पाची सुरुवात त्यांनी गडाच्या परिसरात वृक्षारोपण करून केली. यावेळी विविध वृक्षांची सुमारे एक हजार रोपे उपस्थितांना वाटप करण्यात आली. वंचित ,उपेक्षित ,दुर्बल घटकांना न्याय देण्याची भूमिका आयुष्यभर जपणाऱ्या आपल्या मुंडे साहेबांना अभिप्रेत असेच काम तुम्ही आणि मी आपण सर्वांनी करायचे आहे. आपण जसे वागू तसे परिणाम दिसत असतात. त्यामुळे स्वाभिमान जपत आपण स्वर्गातही मुंडे साहेबांची मान उंचावेल असेच काम केले पाहिजे. सामाजिक सलोखा आणि आपल्यापेक्षा क्षीण व्यक्तीच्या मदतीला आपण आले पाहिजे. जागतिक स्तरावर आज संकटाची परिस्थिती असून आपल्या देशात ही परिस्थिती उद्भवू नये यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने आपल्याला आवाहन करत आहेत. या देश कार्यात आपण सहभाग घेतला पाहिजे. आपल्या कृतीतून आणि माणसाला माणूस म्हणून जगता यावे या उद्देशाने प्रत्येकाने योगदान देणे अभिप्रेत आहे. गोपीनाथ गडाच्या उभारणीला अमित शहा, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अनेक मंत्री, अनेक पक्षप्रमुख आले होते. सर्वच शीर्षस्थ नेते आपल्या गडावर येऊन गेले आहेत आता एकमेव पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या गडावर यायचे राहिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी भविष्यात गोपीनाथ गडावर नक्कीच येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

-------------

## मोदी सरकारने देशाची

आरबीआयने सुमारे १२ अब्ज डॉलर्स (सुमारे १.१४ लाख कोटी रुपये) मूल्याचे सोने विकले असण्याची शक्यता आहे. रुपयाची घसरण रोखण्यासाठी आणि डॉलरचा साठा मजबूत करण्यासाठी आरबीआयने हे पाऊल उचलल्याचे या अहवालात म्हटले आहे. मात्र, या संदर्भात आरबीआयकडून अद्याप अधिकृत स्पष्टीकरण आलेले नाही.दरम्यान, या घसरत्या आर्थिक स्थितीवरून काँग्रेसने मोदी सरकारला धारेवर धरले आहे. मोदी सरकारकडून रुपया सांभाळला जात नाही. कोणत्याही क्षणी १ डॉलर १०० रुपये होऊ शकतो, अशी भीती काँग्रेसने व्यक्त केली आहे.पंतप्रधान मोदींना देशाच्या अर्थव्यवस्थेपेक्षा स्वत:च्या प्रतिमेची जास्त काळजी आहे. स्वत:ची फर्जी प्रतिमा वाचवण्यासाठी आरबीआयवर दबाव आणून देशाचे सोने विकले जात आहे, जेणेकरून रुपया १०० च्या पार जाऊ नये. परंतु, आता खूप उशीर झाला असून सत्य सर्वांसमोर आले आहे, अशी टीका काँग्रेसने केली. तसेच मोदी आहेत तोपर्यंत देश उद्ध्वस्त आहे हे आता सिद्ध होत आहे, असा टोलाही लगावला.

---------------

## परळीतील जमीन घोटाळा: मुख्यमंत्र्याकडून दखल

न करणारे तहसीलदार दोषी ठरतील. बोगसगिरीचा कळस यातून उघड होत आहे धर्मापुरी येथील जागरूक नागरिक रवींद्र मुंडे यांनी या प्रकरणात सुरुवातीला छडा लावण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना यश येत नव्हते. त्यामुळे त्यांनी हे प्रकरण ॲड. देशमुख यांच्याकडे सोपवले आणि त्यानंतर प्रकरणाने गती घेतली आहे. विशेष बाब म्हणजे या तीनही गावातील प्रतिष्ठित शेतकरी म्हणजेच मूळ शेतकरी हे सर्व या तक्रारीमुळे समाधानी झाले असून बोगसगिरीला लगाम लागावा, अशी शेतकऱ्यांनी देखील इच्छा व्यक्त केली आहे एकूण ४३ गटांमध्ये २६२ एकर जमीन अस्तित्व अस्तित्वात नसतानाही वाढवण्यात आली आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून ही उघडकीस आल्यानंतर एकही लोकप्रतिनिधी यावर बोलायला तयार नाही. धर्मापुरी, हेळम आणि दैठणा घाट या तीन गावातील हा प्रकार उघडकीस आला असून परळी सह अन्य काही ठिकाणी असा प्रकार घडल्याचे देखील दिसून येत आहे.जिल्ह्यातील बोगसगिरी कमी व्हावी, यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे आवश्यक आहे. वास्तविक पाहता खरा शेतकरी बोगसगिरी करत नाही. बोगसगिरी करणारे लोक बोटावर मोजण्या इतके आहेत. मात्र त्यांचा तो धंदा असल्यामुळे हे प्रकार चालू आहेत. याचा पाठपुरावा करू आणि वेळप्रसंगी आंदोलने देखील करू, असा इशाराही देशमुख यांनी दिला आहे.

-------------------

## संत तुकोबांच्या वारीचं

आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. जेष्ठ वद्य सप्तमी, मंगळवार ७ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र देहू येथील मुख्य देऊळवाड्यातून संत तुकाराम महाराजांची पालखी भक्ती, श्रद्धा आणि नामस्मरणाचा गजर करत पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. यंदाच्या पालखी सोहळ्यासाठी ह.भ.प. विक्रमसिंह उमराज मोरे, ह.भ.प. उमेश सुरेश मोरे आणि ह.भ.प. लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांची पालखी सोहळा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच पालखी रथ आणि चौघडा गाडीसाठी संस्थानतर्फे तीन बैलजोड्या खरेदी करण्यात आल्या असून त्या यंदाच्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. तुकोबारायांच्या पालखीसह संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचीही उत्सुकता वारकरी आणि विठ्ठलभक्तांना असते. त्यामुळे, आता संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आळंदीतून पंढरीकडे कधी प्रस्थान होणार हेही लवकरच समजणार आहे.

---------------

## पोलीस अधीक्षक सुट्टीवर: परस्परविरोधी

अशा प्रकारच्या दबावाच्या राजकारणाला थारा मिळाला नव्हता. परंतु, ते रजेवर जाताच स्थानिक पातळीवर कायदा हातात घेण्याचे आणि यंत्रणेला हाताशी धरण्याचे प्रयत्न सुरू झाल्याचे चित्र आहे. खिंडकर बंधू अन्? देशमुखांचे 'हायव्होल्टेज' नाट्य या दरम्यान पहावयास मिळाले दादा खिंडकर हे समाधान खिंडकरचे बंधू तर स्व संतोष देशमुख यांचे बंधू असलेले धनंजय देशमुख यांचे ते साडू खेडकर बंधूंनी एकमेकावर परस्परविरोधी गुन्हे दाखल केले गोळीबार दहशत धमकी असे कलम लागले गेले यानंतर धनंजय देशमुख यांनी थेट धनंजय मुंडे यांनीच आपल्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला डोक्याला बंदूक लावली अशा स्वरूपाची ही तक्रार दाखल केली गेली हे सर्व पोलीस अधीक्षक रजेवर जाताच, जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला. दादा खिंडकर, समाधान खेडकर आणि दादा खिंडकर यांचे साडू धनंजय देशमुख यांनी एकमेकांविरोधात गंभीर आरोप करत थेट पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल केले. या हायव्होल्टेज नाट्यामुळे बीडच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली होती. या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी जेव्हा अंतर्गत तपास चक्रे फिरवली, तेव्हा या तपासातून एक धक्कादायक सत्य समोर आले. हे गुन्हे केवळ वैयक्तिक आणि राजकीय आकसापोटी दाखल करण्यात आले असून, तपासात ते पूर्णपणे 'खोटे' असल्याचे निष्पन्न झाले आहे. काही वर्षांपूर्वी परस्परविरोधी गुन्हे दाखल करणे गंभीर पुण्यामध्ये अटक करणे असे प्रकार घडत होते मात्र या सर्व प्रकाराला मध्यंतरी आळा बसला होता जिल्ह्यात कोणतीही अशी घटना घडली नव्हती मात्र पोलीस अधीक्षक काही दिवसाच्या रजेवर जातात पाठीमागे ही गंभीर घटना घडली ही घटना म्हणजे याला संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला काही धागे जोडणारे आहेत त्यामुळे पुन्हा सामाजिक संतुलन बिघडण्याचा धोका निर्माण झाला होता परंतु हे परस्पर विरोधी गुन्हे दाखल झाल्यानंतर पोलिसांनी याचा बारकाईने तपास केला आणि हे गुन्हे देशातून एकमेका विरुद्ध दाखल केले असल्याचे निष्पन्न झाले व हे गुन्हे खोटे होते पण आता पोलीस खोटे गुन्हे दाखल करणार यावर काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे किमान भविष्यात अशा खोट्या गुन्ह्यामध्ये एकमेकांना अडकवण्याचे षडयंत्र कमी होईल यासाठी आता कडक कारवाई व्हावी अशीच अपेक्षा जनतेकडून व्यक्त केली जात आहे.

----------------

## मुंबईतील ऐतिहासिक एअर इंडिया इमारत

असे निर्देश दिले. कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड न करता दीर्घकालीन टिकाऊपणा लक्षात घेऊन सर्व दुरुस्ती व नूतनीकरणाची कामे करण्यात यावीत, असे सांगत त्यांनी विद्युत यंत्रणा, फिटिंग्ज आणि इतर तांत्रिक सुविधांसाठी उच्च दर्जाच्या साहित्याचा वापर करण्यावर भर दिला. इमारतीच्या मुख्य प्रवेशभागाचे महाराष्ट्राच्या वैभवाला साजेसे आकर्षक व सुशोभित स्वरूप विकसित करण्यात यावे. यासाठी देशातील नामांकित वास्तुविशारद व तज्ज्ञ संस्थांचे मार्गदर्शन घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. राज्याच्या कानाकोपऱ्यातून मंत्रालयीन कामकाजासाठी मुंबईत येणाऱ्या नागरिकांची सुरक्षितता, सुलभता आणि व्यवस्था ही प्रशासनाची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे नमूद करत सर्व कामे निर्धारित कालावधीत आणि उच्च दर्जाने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री भोसले यांनी दिले.या मोक्याच्या जागेवरील इमारत खरेदीसाठी राज्य मंत्रिमंडळाने ८ सप्टेंबर २०२३ रोजी मान्यता दिली होती. त्यानंतर विविध प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून राज्य शासनाने 'एअर इंडिया असेट होल्डिंग कॉर्पोरेशन' () कडून १६०१ कोटी रुपयांना ही वास्तू संपादित केली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक निधी अदा केल्यानंतर २ जून २०२६ रोजी ही इमारत अधिकृतपणे महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात घेण्यात आली. या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता तातडीने प्रदान करण्याचे आदेशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या ऐतिहासिक वास्तूमुळे राज्य शासनाच्या विविध कार्यालयांसाठी प्रशस्त, आधुनिक आणि सुसज्ज जागा उपलब्ध होणार असून, प्रशासनाची कार्यक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (रस्ते) श्री. आबासाहेब नागरगोजे, मुख्य अभियंता सौ. प्रज्ञा वाळके तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांनी मंत्री भोसले यांना इमारतीची सद्यस्थिती, आवश्यक दुरुस्ती व प्रस्तावित नूतनीकरण कामांबाबत सविस्तर माहिती दिली.

-----------------

## सुट्ट्या संपणार १५ जूनलाच शाळेत

कोणताही बदल करण्यात आलेला नसून, शाळादेखील पारंपरिक पद्धतीनेच ऑफलाईन सुरू होणार आहेत. राज्यातील इतर मंडळाच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरू असल्यास किंवा अशा शाळांमध्ये महत्त्वाचे शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्यास, विद्यार्थ्यांना सुटी जाहीर करण्याबाबत शाळा प्रशासनाने त्यांच्या स्तरावर योग्य निर्णय घ्यायचा आहे.परंतु, विदर्भ, तसेच इतर सर्व विभागांतील राज्य मंडळाच्या शाळा १५ जून रोजी सुरू करण्यात याव्यात. जून महिन्यातील विदर्भाचे तापमान विचारात घेता १५ जून ते २९ जून या कालावधीत सकाळी ७ ते ११.४५ या वेळेत सुरू करण्यात याव्यात, ३० जूनपासून नियमित वेळेत शाळा सुरू करण्यात याव्यात, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

**शैक्षणिक साहित्य महागले**

शाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिले असून, शालेय साहित्य खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये पालकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. वह्या, पुस्तके, गणवेश, बूट, दप्तर आणि अन्य शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. मात्र, वाढत्या महागाईमुळे शालेय साहित्याच्या किमतीत २० ते ३० टक्के वाढ झाल्यामुळे पालकांच्या खिशाला चांगलीच झळ पोहोचत आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ०४ जून २०२६



# स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिमेद्वारे ग्रामीण स्वच्छता व पर्यावरण संवर्धन करा

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये घनकचरा व्यवस्थापन व्यवस्थापनाचा उपक्रम राबविल्या जात आहे. स्वच्छतेच्या या चळवळीत सर्व ग्रामस्थांनी सहभागी व्हावे . स्वच्छता आणि पर्यावरणाबाबत गावाचा आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी . पुढील वर्षभरात गावागावात जनजागृती व्हावी तसेच या चळवळीचा प्रारंभ स्वतःच्या कुटुंबापासून करावा असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी केले आहे. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्त पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) यांच्या सूचनेप्रमाणे ५ जून २०२६ रोजी स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी, पर्यावरण संवर्धन, लोकसहभाग आणि स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करणे हा मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या मोहिमेअंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत सामुदायिक घनकचरा व्यवस्थापन साधनसुविधांचे स्वयंमूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यात येणार आहे. कंपोस्ट खड्डे, कचरा वर्गीकरण शेड, कचरा संकलन वाहने, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन युनिट्स यांची कार्यस्थिती तपासण्यात येणार असून, ग्रामीण भागातील जुने कचरा डेपो (ङशसरलू थरींश ॲीीिळिींशी) यांची नोंदणी देखील करण्यात येणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या घटकांची (ईींश्रज्ञ थरींश ऋशपशीरींी - इथऋ) ओळख पटवून त्यांची यादी तयार केली जाणार आहे. अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी



यांनी दिली आहे.

मोहिमेचा प्रथम दिनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांबाबत ग्रामपंचायत कर्मचारी, पंचायत सचिव व प्रमुख समन्वयकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. ग्रामपंचायत स्तरावरील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांची पाहणी व कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यात येईल. माझे गाव, माझी जबाबदारी या संकल्पनेअंतर्गत नागरिकांचा सहभाग वाढवून सामाजिक माध्यमांवर जनजागृती करण्यात येणार आहे.दि. ४ जून रोजी ग्रामपंचायतीमार्फत प्रभात फेरी, शाळेमध्ये चित्रकला व निबंध स्पर्धा तसेच गावातील महिला बचत गट संवाद, स्वच्छता मोहीम तसेच एक पेड़ माँ के नाम अंतर्गत वृक्षारोपण उपक्रमाचे नियोजन करणे युवक, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, शालेय विद्यार्थी व नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे. चळीीळेप डळलऋए अंतर्गत पाणी बचत, एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकला नकार, कचरा कमी करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याबाबत जनजागृती केली जाणार आहे.

दि. ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार असून, मोहिमेतील कामांचा आढावा घेण्यात येईल. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६, कचरा वर्गीकरण, कंपोस्टिंग, लोकसहभाग आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर ग्रामसभेमध्ये विशेष चर्चा होणार आहे. तसेच मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या उपक्रमांचे फोटो व व्हिडीओ डइच(ऋ) खचखड पोर्टलवर अपलोड करण्यात येणार आहेत.या अनुषंगाने यांनी ग्रामीण भागाती ग्रामस्थ ग्रामपंचायत पदाधिकारी, महिला बचत गट, युवक व स्वयंसेवी संस्थांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा. तसेच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन व लोकसहभागाच्या माध्यमातून स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींनी प्रभावीपणे मोहीम राबवावी असे आवाहन देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.



## पिंपळनेर येथे गोपीनाथ मुंडे पुण्यतिथी कार्यक्रम

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री गणेश सार्वजनिक वाचनालयात संकल्प सेवाभावी संस्था व श्री गणेश सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने माजी केंद्रीय मंत्री तथा महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ राव मुंडे यांचा पुण्यतिथी कार्यक्रम पार पडला.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य राजेश गवळी व माजी सरपंच भारत जवळकर यांच्या हस्ते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माझे सरपंच भारत जवळकर तर प्रमुख पाहुणे म्हणून राजेश गवळी, नंदू बीटे, सोनाजी ठोकरे सह आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याला उजळा दिला. या कार्यक्रमाला पत्रकार बळीराम मेहत्रे, मच्छिंद्र साठे, अंकुश तागड, अमोल ठोकरे, श्रीकांत ठोकरे, बळीराम साठे, नारायण मेहत्रे, लहू तागड, भागवत पावणे, धनंजय तिरगुळ, शिवाजी काळे, तुकाराम सिरसाट, रमेश खराडे, बाबुराव रोमन, अशोक गाडे, गोरख ठोकरे सह नागरिक उपस्थित होते.

## एसटी महामंडळात शिकाऊ उमेदवारांची भरती

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड विभागीय कार्यालयाअंतर्गत सन २०२६-२७ या सत्रासाठी विविध व्यवसायांमध्ये शिकाऊ उमेदवार निवड प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. एसटी महामंडळाच्या कार्यशाळेत थेट कामाचा अनुभव मिळविण्याची सुवर्णसंधी बीड जिल्ह्यातील तांत्रिक शिक्षण घेतलेल्या तरुणांना या निमित्ताने मिळणार आहे. कौशल्याधारित रोजगाराला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने तयार केलेल्या अधिकृत एम.आय.एस पोर्टलच्या नियमानुसार ही भरती होत आहे. ही निवड प्रक्रिया प्रथम ऑफलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारून आणि त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी केंद्र सरकारच्या अधिकृत . या संकेतस्थळाला भेट देऊन माहिती घ्यावी. इंटरनेट किंवा तांत्रिक अडचणी असल्यास उमेदवारांनी थेट विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी महामंडळाच्या ०२४४२-२२२५८० या अधिकृत दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन बीड एसटी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



आसोला तालुका धारूर येथे मुंडे साहेबांची पुण्यतिथी साजरी करताना बीड जिल्हा सचिव तथा मन की बात संयोजक जिल्हा बीड बालासाहेब चोले सरपंच अशोक चोले पंचायत समितीचे माजी उपसभापती ज्ञानोबा बापूचोले चेअरमन मधुकर बोबडे युवा मोर्चाचे उपाध्यक्ष राधाकृष्ण उपसरपंच प्रकाश मोरे अंकुश छोले विजय कुमार अंकुशे रामेश्वर चोले महादेव छोले भास्कर चोले सह सर्व ग्रामस्थ उपस्थित होते

# खोट्या गुन्ह्याप्रकरणी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करा

**बीड ग्रामीण पोलीस ठाण्यातील प्रकरणानंतर खा.बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र**

केज । प्रतिनिधी

बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झालेला एक गुन्हा खोटा असल्याचे समोर आल्यानंतर, या प्रकरणी निष्पाप नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या आणि खोटा गुन्हा दाखल करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्याना थेट पत्र पाठवले असून, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दि.३१ मे २०२६ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक ०१९२ ची नोंद करण्यात आली होती. मात्र, हा गुन्हा नोंद झाल्यानंतरच्या दुसऱ्याच दिवशी उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सदर गुन्हा खोटा असल्याची माहिती अधिकृतपणे दिली. जर एखादा गुन्हा खोटा असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडूनच स्पष्ट होत असेल, तर कोणतीही पुरेशी पडताळणी किंवा वस्तुस्थितीची खातरजमा न करता असा गुन्हा नोंदवण्यामागची नेमकी जबाबदारी कोणाची? हे निश्चित करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या चुकीच्या कारवाईमुळे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा येते आणि पोलीस यंत्रणेच्या विश्वासार्हतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, याची तात्काळ सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. तसेच खोटा गुन्हा नोंदवण्यास जबाबदार असलेल्या दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. या पत्राच्या प्रतिलिपि त्यांनी पोलीस महासंचालक (महाराष्ट्र राज्य, मुंबई), विशेष पोलीस महानिरीक्षक (छत्रपती संभाजीनगर) आणि पोलीस अधीक्षक (बीड) यांना पुढील योग्य कारवाईसाठी पाठवल्या आहेत.

### जिल्ह्याची बदनामी करणाऱ्यांवर कारवाई व्हावी

यापूर्वी बीड जिल्ह्यात अशा पद्धतीचे खोटे गुन्हे दाखल होत असल्यामुळे जिल्ह्याची मोठी बदनामी झाली होती आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला होता. गेल्या वर्षभरापासून जिल्ह्यातील परिस्थितीत सुधारणा झाली असताना, आज पुन्हा काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून खोटे गुन्हे दाखल करण्यास कोण सांगत आहे? याचा शोध घेणे गरजेचे आहे, असा थेट सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी केला आहे.

## उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी मिलिंद बोरकर निवडणूक निरीक्षक

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणूक -२०२६ अंतर्गत उस्मानाबाद- लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून श्री.मिलिंद बोरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.भारत निवडणूक आयोगाच्या १ जून २०२६ पत्रानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोग,नवी दिल्ली यांच्या दि.१८ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.त्यानुसार उस्मानाबाद- लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून श्री.मिलिंद बोरकर (भा.प्र.से.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारसंघाशी संबंधित बाबींकरिता त्यांच्याशी मोबाईल क्रमांक ९९३०९९८९६९ वर संपर्क साधता येणार आहे.निवडणूक निरीक्षक श्री.मिलिंद बोरकर यांच्या राहण्याची व्यवस्था धाराशिवजवळील शिंगोली येथील सर्किट हाऊसमध्ये करण्यात आली आहे.

## महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील मुरूमकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल, आ.सुरेश धस यांनी दिल्या शुभेच्छा



आष्टी । प्रतिनिधी

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीसाठी महायुतीचे भाजपचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील मुरूमकर यांनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.यावेळी आ.सुरेश धस यांनी उपस्थित राहून पाटील यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या.धाराशिव येथील जिल्हाधिकारी कार्यालयात मोठ्या उत्साहात आणि महायुतीच्या प्रमुख नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भव्य उपस्थितीत हा अर्ज दाखल करण्यात आला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी एकजुटीचे दर्शन घडवत बसवराज पाटील मुरूमकर यांच्या उमेदवारीला जोरदार पाठिंबा दर्शविला.यावेळी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार राणाजगजीतसिंह पाटील,आमदार विक्रम बाप्पा काळे,आमदार अभिमन्यू पवार तसेच आमदार रमेश कराड यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील मुरूमकर यांच्या विजयाबाबत विश्वास व्यक्त करत स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधींनी मोठ्या मताधिक्याने त्यांना विजयी करावे, असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले.उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने महायुतीची ताकद आणि संघटनात्मक एकजूट पुन्हा एकदा दिसून आली.

## २९ वर्षांची निष्ठावंत सेवा पूर्ण; बिबीशन तिडके यांच्या निरोप समारंभात भावुक वातावरण

माजलगांव । प्रतिनिधी

श्री शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेत गेली २९ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावणारे श्री बिबीशन गोविंदराव तिडके हे शासनाच्या नियमानुसार सेवेतून निवृत्त झाल्याने त्यांचा संस्थेच्या वतीने भावपूर्ण सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार मा. मोहनराव (काका) सोळंके यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना मा. मोहनराव (काका) सोळंके यांनी श्री तिडके व त्यांच्या पत्नीला पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत निरोगी, सुखी व समाधानी जीवनाच्या सदिच्छा व्यक्त केल्या. श्री बिबीशन तिडके यांनी आपल्या सेवाकाळात शांत, संयमी आणि कर्तव्यनिष्ठ कर्मचारी म्हणून काम केले. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची कार्यपद्धती संस्थेसाठी नेहमीच लाभदायी ठरली.



त्यांच्या सेवाकाळात कोणतीही तक्रार न आल्याने त्यांनी संस्थेच्या विकासात मोलाचे योगदान दिल्याचे मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना अनेकांना भावनिक क्षणांचा अनुभव आला. संस्थेचे सचिव ॲड. विठ्ठलरावजी (दादा) तिडके यांनी आपल्या लहान बंधू बिबीशन तिडके यांच्या बालपणातील संघर्ष आणि कठीण परिस्थितीची आठवण सांगितली. त्यावेळी त्यांचे डोळे पाणावले आणि उपस्थितांनाही आपल्या भावना आवरता आल्या नाहीत.तिडके कुटुंबीयांनी आपल्या यशाचे व प्रगतीचे श्रेय श्री शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मोहनराव (काका) सोळंके यांना दिले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी श्री बिबीशन तिडके यांना सेवानिवृत्तीबद्दल शुभेच्छा देऊन त्यांच्या पुढील आयुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. यावेळी भाजपा राज्य परिषद सदस्य अरुण राऊत, अर्जुन नाईकनवरे , सत्यनारायण उगवणे, डॉ . अशोक तिडके,बाळासाहेब क्षीरसागर, कल्याण शेप, सुभाष साळवे,अजय सोळंके, नितीन तिडके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# निर्भय,नि:पक्षपणे व मुक्त वातावरणात निवडणूक होईल याची दक्षता घ्या-निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक विधान परिषद निवडणूक २०२६ साठी येत्या १८ जून रोजी मतदान होणार आहे.निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करून ही निवडणूक निर्भय,नि:पक्षपणे आणि मुक्त वातावरणात पार पडेल याची दक्षता घ्यावी,असे निर्देश निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज बुधवारी (दि.३) विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.प्रियंवदा म्हाडदळकर,पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे,निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव,उपजिल्हाधिकारी प्रवीण धरमकर, संतोष राऊत,श्रीमती.स्वाती शेंडे,श्रीमती. अरुणा गायकवाड,धाराशिव उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,धाराशिव तहसीलदार डॉ.मृणाल जाधव,पोलीस निरीक्षक अमोघ भुजबळ उपस्थित होते.तसेच ऑनलाइन पद्धतीने बीडच्या प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके,लातूरचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी केशव नेटके,बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे सहभागी होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना श्री.बोरकर म्हणाले की,राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी या निवडणुकीत सूक्ष्म निरीक्षक म्हणून काम पाहणार आहेत.त्यामुळे तीनही जिल्ह्यांतील सूक्ष्म निरीक्षकांच्या याद्या मागवून घ्याव्यात.मतदान साहित्य वितरण व स्वीकृती केंद्राचे काम योग्य प्रकारे पार पाडावे.मतपेट्या सुरक्षितपणे मतदान केंद्रावर पोहोचविणे तसेच मतदानानंतर सीलबंद मतपेट्यांची वाहतूक कडक सुरक्षा व्यवस्थेत करावी.या प्रक्रियेत कोणतीही उणीव राहणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी.असे ते म्हणाले.

मतदान केंद्रावरून मतदान प्रक्रियेची वेळोवेळी माहिती संकलित करण्यात यावी असे सांगून श्री.बोरकर म्हणाले की, मतदान प्रक्रियेचे वेबकास्टिंग करण्यात यावे.मतदान केंद्र तहसील कार्यालयात असल्याने दिव्यांग मतदारांच्या सोयीसाठी रॅम्प व व्हीलचेअरची व्यवस्था उपलब्ध असावी,असेही त्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी घ्यावी.आचारसंहितेच्या अंमलबजावणीत दक्ष राहून काम करावे.प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तात्काळ दखल घ्यावी. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे नि:पक्षपाती राहण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे,असेही श्री.बोरकर यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार म्हणाले की,सर्व मतदान पथकांना तीनही टप्प्यांतील प्रशिक्षण व्यवस्थित व परिपूर्ण पद्धतीने देण्यात यावे.तसेच आचारसंहिता भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव यांनी निवडणुकीची माहिती देताना सांगितले की,या निवडणुकीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे ६३ व लातूर जिल्हा परिषदेचे ६९ असे एकूण १३२ मतदार आहेत.लातूर महानगरपालिकेचे ७७ मतदार,बीड जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतींचे ३०४,लातूर जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतींचे २२१ आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतींचे २५४ असे एकूण ७७९ मतदार आहेत. जिल्हा परिषद,महानगरपालिका आणि नगरपालिका/नगरपंचायतींचे मिळून एकूण ९८८ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार आहेत.बीड जिल्हा परिषदेची निवडणूक झालेली नसल्यामुळे त्या जिल्ह्यातील जिल्हा परिषद सदस्य मतदार म्हणून नसल्याची माहितीही त्यांनी दिली. या बैठकीला लातूर आणि बीड जिल्ह्यांतील निवडणुकीशी संबंधित विविध विभागांचे अधिकारी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### मुख्याध्यापक श्रीराम कुऱ्हे

कांबळे, सुरज चुंगडे, दत्ता जाधव, सुभाष क्षीरसागर, अरूण बोंगाणे, नागसेन मस्के, अमोल पौळ, आमेर सिद्दीकी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय दुधाळ, आशिष काळे यांच्यासह मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह महिला, पुरूषांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संतोष मोरे यांनी तर सूत्रसंचालन श्रीराम जाधव यांनी केले. शेवटी सुरज कुऱ्हे यांनी आभार मानले.

### गेवराई तहसीलदाराकडून

आहे प्रामुख्याने जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकाराकडे गांभीर्याने पाहून संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे घरकुलधारकांना हक्काची वाळू मिळत नाही शासनाच्या आदेशानुसार पाच ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय झाला असला तरी ही वाळू घरकुलधारकांना न देता त्यांच्या नावावर घेऊन ती इतरांना विक्री केली जात आहे यामध्ये महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या प्रमाणात सहभागी असून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

### महिलेची फसवणूक

आणि बँकेकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास सुरू केला. सुरुवातीला पोलिसांनी फसवणूक करणाऱ्या आरोपींकडून ८९,०००/- रुपये जप्त केले होते. मात्र, या गुन्ह्यातील मुख्य आरोपी पोलिसांना सतत गुंगारा देत होता. त्याचा शोध पुणे, अहिल्यानगर (अहमदनगर) आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये घेण्यात आला, परंतु तो मिळून आला नाही.दिनांक ०२ जून २०२६ रोजी बीडच्या टेक्निकल सेल विभागाकडून मिळालेल्या अचूक तांत्रिक माहितीच्या आधारे, मुख्य आरोपी श्रीकृष्ण गोवर्धन आंधळे (रा. हिंगणी, ता. जि. बीड) हा चौसाळा येथे असल्याची माहिती मिळाली. सायबर पोलिसांनी तातडीने सापळा रचून त्याला चौसाळा येथून ताब्यात घेतले.

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपी श्रीकृष्ण आंधळे याने आपला गुन्हा कबूल केला. पोलिसांनी त्याच्याकडून फसवणुकीच्या रक्कमेतील उर्वरित ४५,०००/- रुपये देखील जप्त केले. यामुळे तक्रारदार महिलेला तिची फसवणूक झालेली संपूर्ण रक्कम परत मिळाली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मंजूर केली असून, त्याची रवानगी बीड जिल्हा कारागृहात करण्यात आली आहे.

या पथकाने केली कारवाई

ही धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भारत जायभाये, पोलीस हवालदार विजय घोडके, पोलीस अंमलदार निलेश उगलमुगले आणि अंकुश तोटेवाड यांच्या पथकाने केली आहे. सायबर पोलिसांच्या या तत्परतेबद्दल बीड जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

### रस्ते कामात भ्रष्टाचार

काढण्याची तयारी करत आहोत.पाटोदा तालुक्यातील सर्व बोगस खडीकरण कामांची तत्काळ चौकशी दोषी ठेकेदारांवर ऋखठ आणि ब्लॅकलिस्टिंग संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई व निलंबन शेतकऱ्यांच्या जमिनीवरून रस्ता काढताना पूर्वपरवानगी व नुकसानभरपाई अनिवार्य

कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी स्वतंत्र समिती

सध्या पाटोदा तालुक्यात शेतकरी-ग्रामस्थांचा रोष शिगेला पोहोचला आहे. प्रशासनाने वेळीच लक्ष घातले नाही तर मोठा सामाजिक संघर्ष उद्भवू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# सोयाबीनला क्विंटलमागे ७ हजारांचा दर

## शेतकऱ्यांची झोळी रिकामी, साठेबाजांना मात्र फायदा

पुणे : आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढती मागणी, अमेरिकेतील संभाव्य उत्पादन घट आणि देशांतर्गत कमी झालेला साठा यामुळे सोयाबीनच्या दरात अचानक तेजी आली आहे. गेल्या तीन वर्षातील ही सर्वाधिक भाववाढ मानली जात असली, तरी बहुतांश शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी माल शिल्लक नसल्याने या तेजीचा फायदा साठेबाज आणि व्यापारी वर्गालाच होत असल्याचे चित्र आहे.

या आठवड्यात काही ठिकाणी सोयाबीनला प्रतिक्विंटल तब्बल सहा हजार ८०० ते सात हजार २०० रुपयांपर्यंत दर मिळाला. एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यापासून सोयाबीनच्या दरात सुधारणा होण्यास सुरुवात झाली. तब्बल तीन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर सोयाबीनने सहा हजारांचा टप्पा ओलांडला आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला सहा हजार १५० रुपये असलेला दर १० मे नंतरही सहा हजार रुपयांवर स्थिर आहे. २० मे रोजी झालेल्या लिलावात सोयाबीनला कमाल सात हजार रुपये, तर सर्वसाधारण सहा हजार ५८० रुपये भाव मिळाला. सोयाबीनचा केंद्र सरकारचा हमीभाव



पाच हजार ३२८ रुपये असताना, बाजारात मिळत असलेला दर त्यापेक्षा जवळपास एक हजार ३०० रुपयांनी अधिक आहे. सध्या खाद्यतेल उद्योगांकडून वाढलेली मागणी आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ-उतारामुळे गेल्या महिनाभरात सोयाबीनच्या दरात प्रतिक्विंटल तब्बल हजार ते एक हजार २०० रुपयांची वाढ झाली आहे. खाद्यतेल वाढत उद्योगांकडून मागणी असल्याने बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे सध्यस्थितीत दिसून येत आहे.

आता शेतकऱ्यांकडे माल शिल्लक नसताना व्यापारी आणि साठेबाज मात्र वाढत्या दराचा फायदा घेत असल्याचे बोलले जात आहे. व्यापारी वर्गाच्या मते, पुढील काही दिवसांतही आता बाजारातील तेजी कायम राहण्याची शक्यता आहे. मागणी वाढत असल्याने बाजारात आवक मर्यादित असून सोयाबीनचे दर प्रतिक्विंटल आठ हजार रुपयांपर्यंत जाऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे सध्यातरी आता शेतकऱ्यांमध्ये समाधान दिसून येत आहे.

आयात-निर्यातीवरील परिणाम, जागतिक खाद्यतेल बाजारातील बदल आणि व्यापाऱ्यांकडून साठवून ठेवलेला माल टप्प्याटप्प्याने येत असल्याने दरांना अधिक आधार मिळत आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी हंगामाच्या सुरुवातीलाच कमी दरात सोयाबीनची विक्री केली.

# शेवाळाच्या शेतीतून मिळते बक्कळ कमाई

शेतकरी मित्रांनो शेतीमध्ये नवनवे तंत्रज्ञान विकसीत झाले आहे त्यामुळे केवळ जमिनीतून होणारी लागवड नव्हे तर इतर पद्धतीने देखील लागवड करता येते. स्पिरुलिना लागवड म्हणजेच शेवाळाच्या शेती केल्यास यातून बक्कळ पैसे मिळू शकतात. स्पिरुलिना हे औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहे त्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते कारण त्यातून प्रचंड उत्पन्न मिळते. आरोग्यदायी फूड सप्लिमेंट म्हणौन त्याचा आहारात वापर केला जातो. ते खूप महागड्या किमतीने विकले जाते.




स्पिरुलिना लागवड पद्धत :स्पिरुलिनाच्या लागवडीसाठी, आपण ज्या क्षेत्रात लागवड करत आहोत त्या क्षेत्राचे तापमान १५ अंश सेल्सिअस ते ४५ अंश सेल्सिअस असावे. परंतु ते १५ डिग्री सेल्सियसपेक्षा कमी नसावे. यासोबतच पाण्याचा पीएच ९ पेक्षा जास्त असावा. पण समुद्राच्या क्षेत्रापासून दूर असलेल्या भागात सोडियम क्लोराईड, बेकिंग सोडा आणि मीठ टाकून पाण्याचा पीएच वाढवता येतो. यासाठी टाकी बनवू शकता किंवा स्वस्तात काम करायचे असल्यास, तुम्हाला खड्डा खोदून त्यात प्लास्टिक टाकावे लागेल. त्यात आधी पाणी टाकावे लागते. पाण्यात प्रति हजार लिटर मागे एक किलो मदर कल्चर म्हणजेच शेवाळ स्लरी सोडल्या जातात. त्यानंतर ठराविक वेळा पर्यंत पाणी ढवळून ठेवले जाते. सुमारे ३० ते ४५ दिवसांपर्यंत स्पिरुलिनाची वाढ काढणी योग्य होते. त्यानंतर ५०० मायक्रोनच्या जाळीतून पाणी पूर्णपणे काढून टाकले जाते. तयार स्पिरुलिनाचे नूडल्स किंवा पापड करून तापमानामध्ये सुकवली जातात. पावडर तयार करून पुढे यंत्राद्वारे टेबलेट्स तयार केल्या जातात.स्पिरुलिनाची गोळी बनवायची पद्धत :स्पिरुलिना बंद खोलीत ठेवा, जिथे हवा नसेल. ते कोरडे होईपर्यंत त्या खोलीत ठेवा. यानंतर हाताने लाटून पेनासारखा पातळ करा. त्यानंतर त्याचे तुकडे करून घ्या. आपण त्याचे ५०० मिलीग्राम टॅब्लेट बनवू शकता.एक एकरात इतकी कमाई होईल :स्पिरुलिनाचे उत्पादन दररोज सरासरी आठ ग्रॅम प्रति चौरस मीटर आहे. या अर्थाने एका एकरात दररोज ३२ किलो उत्पादन होईल.

त्याची सरासरी ८०० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होते. त्यानुसार एका दिवसात २५,९०० रुपये येतात. एका महिन्यात ते सात लाख रुपयांपेक्षा जास्त पैसे देते. त्याचे प्रशिक्षण भारत सरकारच्या एमएसएमई मंत्रालयाच्या अंतर्गत दिले जाते.

# जमिनीनुसार करा खरीप पिकांसाठी खतांची निवड

पिकांना खते ही लागवडीपासून ते वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत द्यावी लागतात. पिकांच्या विविध अवस्थेमध्ये वेगवेगळ्या अन्नद्रव्याची आवश्यकता असते. त्यानुसार खताचे व्यवस्थापन करणे फायदेशीर ठरते.मृदा परीक्षणानुसार पिकांना खते देण्याची शिफारस करण्यात येते. यामध्ये स्फुरद पालाशयुक्त खते पिकास उपलब्ध होण्यास वेळ लागतो, त्यामुळे संपूर्ण मात्रा पिक पेरणीच्या वेळेस द्यावी, तसेच आवश्यकता असल्यास त्यांच्या विद्राव्य स्वरुपातील खतांची वेळ फुलोऱ्याची वेळ, दाणे भरणे वेळेस विद्राव्य खताच्या फवारणीचे अधिक फायदे होतात. नत्रयुक्त खताचा ऱ्हास लवकर होत असल्यामुळे त्यांची आवश्यकतेनुसार दोन ते तीन भागात विभागणी करून त्याची मात्रा पिकात द्यावी.खतांची निवड :खरीप पिकांसाठी मातीचा प्रकार व पीक यानुसार खताची निवड करावी. माती तपासणीमुळे जमिनीची सुपीकता व गुणदोष याबाबतची माहिती मिळते. जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा सामू, सेंद्रिय कर्ब, विद्राव्य क्षारांचे प्रमाण इ. नुसार कोणत्या अन्नद्रव्यांची किती गरज आहे. यांचे प्रमाण ठरवता येते म्हणजेच जमिनीचे आरोग्य समजते. बाजारामध्ये अनेक प्रकारची खते उपलब्ध आहेत. परंतु कोणत्या खतांमध्ये कोणत्या अन्नद्रव्याचे किती प्रमाण व ते कोणत्या स्वरुपात आहे हे पाहून आपल्या पिकासाठी व जमिनीसाठी योग्य आहे का हे पडताळून पाहणे आवश्यक आहे. अशा प्रकारे केलेला खतांचा वापर मूलभूत शिफारशीपेक्षा जास्त परिणामकारक ठरतो व अनावश्यक खतांचा वापर टाळता येऊ शकतो.जमीन आणि पिकांनुसार करा खतांचा वापर :पाणी साचलेल्या जमिनीत नायट्रेटयुक्त खते होत नाही. ज्या जमिनीत गंधकाचे प्रमाण कमी आहे अशा जमिनीत अमोनियम सल्फेट किंवा सिंगल सुपर फॉस्फेट या सारख्या गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर करावा. डाळवर्गीय व गळीत पिकांमध्ये गंधकाची आवश्यकता जास्त असते अशा पिकास गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर जास्त करावा. क्षारयुक्त जमिनीत युरीया वापरल्यास त्याचे नायट्रेटमध्ये रुपांतर होण्यास विलंब लागतो, परंतु नायट्रेट जमिनीत राहिल्यास पिकास अपायकारक ठरतो. म्हणून अशा जमिनीत युरिया ऐवजी अमोनियम नायट्रेट वापरावे. आम्लयुक्त जमिनी सोडून इतर जमिनीत पाण्यात विद्राव्य असलेल्या स्फुरदयुक्त खते वापरावीत. उदा. सिंगल सुपर फॉस्फेट. माती तपासणी अहवालात सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आल्यास शिफारसीनुसार सूक्ष्म अन्नद्रव्याची मात्रा सुध्दा द्यावी कारण ही अन्नद्रव्ये सुध्दा मुख्य व दुय्यम अन्नद्रव्याइतकीच महत्त्वाची असतात.



# हळद लागवडीसाठी शिका नवे तंत्र

हळद पिकांत उत्पन्नाचा मुख्य स्रोत जमिनीत वाढणारा कंद असतो. त्यामुळे लागवडीसाठी योग्य जमिनीची निवड महत्त्वाची ठरते. मध्यम प्रतीची, काळी, पाण्याचा निचरा होणारी जमीन हळद पिकासाठी योग्य असते. पाण्याचा ताण व जास्त पाऊसमान हे पीक काही काळ सहन करू शकते. मात्र, जास्त पिकात पाणी साचून राहिल्यास पिकावर विपरित परिणाम दिसून येतात. पाण्याचा निचरा न झाल्यास कंदकुज होण्याची शक्यता असते. हळद पिकाच्या वाढीसाठी सरासरी २५ ते ३५ अंश सेल्सिअस तापमान वाढीसाठी आवश्यक असते. उगवणीसाठी ३० ते ३५ अंश सेल्सिअस, फुटवे फुटण्यासाठी २५ ते ३० अंश सेल्सिअस, कंद वाढीसाठी २० ते २५ अंश सेल्सिअस, तर कंद पोसण्यासाठी १८ ते २० अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. कोरडे व थंड हवामान कंद वाढीस पूरक ठरते. जास्त तापमान असलेल्या भागात तापमानाची तीव्रता कमी झाल्यानंतरच हळद लागवड करावी. अन्यथा, कमाल तापमानामुळे उगवणीवर विपरित परिणाम होतो.

सुधारित वाण :हळद लागवडीसाठी फुले हरिद्रा, फुले स्वरूपा, सेलम, राजापुरी, कृष्णा, टेकुरपेटा, वायगाव, आंबे हळद हे सुधारित वाण विकसित करण्यात आले आहेत. याशिवाय भारतीय मसाला पिके संशोधन केंद्र, कोझीकोड (केरळ) यांनी सुवर्णा, सुगुणा, सुदर्शना, प्रभा, आयआयएसआर प्रतिभा, आयआयएसआर केदारम हे वाण विकसित केल्या आहेत. तसेच तमिळनाडू कृषी विद्यापीठ, कोईंमबतूर यांच्यामार्फत बीएसआर-१, बीएसआर-२ हे वाण विकसित करण्यात आले आहेत. लागवडीसाठी सुधारित वाणांची निवड महत्त्वाची आहे.

लागवड पद्धती :पाणी देण्याच्या पद्धतीनुसार हळद लागवडीच्या प्रामुख्याने सरी- वरंबा आणि



रुंद वरंबा या दोन पद्धती आहेत.

१) सरी - वरंबा पद्धत :पाटपाणी पद्धतीने सिंचन द्यावयाचे असल्यास सरी- वरंबा पद्धतीने लागवड करावी. या पद्धतीने लागवडीसाठी ७५ ते ९० सें.मी. अंतरावर सरी पाडून घ्यावी. त्यापूर्वी स्फुरद आणि पालाशची मात्रा जमिनीत द्यावी. कारण स्फुरद आणि पालाश खते जमिनीत दिल्यानंतर पिकांस लगेच उपलब्ध होत नाहीत. जमिनीच्या उताराप्रमाणे ६ ते ७ सरी वरंब्याचे एक वाकुरे या प्रमाणे वाकुरी बांधून घ्यावी. वाकुऱ्याची लांबी ही शेताची लांबी आणि जमिनीचा उतार लक्षात घेऊन ५ ते ६ मीटर ठेवावी. सोईप्रमाणे पाणी व्यवस्थित बसण्यासाठी पाण्याचे पाट सोडावेत.

२) रुंद वरंबा पद्धत :ठिबक सिंचन सारख्या आधुनिक सिंचन सुविधा उपलब्ध असल्यास रुंद वरंबा पद्धतीने लागवड फायदेशीर ठरते. रुंद वरंबा तयार करताना १२० सें.मी. अंतरावर सऱ्या पाडून घ्याव्यात. नंतर त्या सऱ्या उजवून ६० ते ७५ सें. मी. माथा असलेले २० ते ३० सें.मी. उंचीचे व उताराचे प्रमाण लक्षात घेऊन योग्य लांबी रुंदीचे वरंबे (गादीवाफे) तयार करावेत.

लागवड वेळ आणि पद्धत :लागवड जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण करावी. लागवडीस उशीर होईल तसा उत्पादनावर परिणाम होतो. एक हेक्टर क्षेत्रावर लागवडीसाठी २५ क्विंटल जेठे गड्डे (म्हणजेच मातृकंद आकाराने त्रिकोणाकृती) बेणे पुरेसे होते. जास्त उत्पादन मिळविण्यासाठी जेठे गड्डे वापरावेत. बेणे वजनाने ५० ग्रॅमपेक्षा अधिक, सशक्त, निरोगी, रसरशीत, नुकतीच सुप्तावस्था संपवून थोडेसे कोंब आलेले असावे. जेठे गड्डे उपलब्ध होत नसतील, तर बगल गड्डे (४० ते ५० ग्रॅम वजनाचे) किंवा हळकुंडे (वजनाने ३० ग्रॅमपेक्षा मोठे) बेणे म्हणून वापरावे. निवडलेली हळकुंडे ठळक, लांब, जाड, ठसठशीत वाढलेली, निरोगी आणि एकसमान (भेसळमुक्त) असावीत. हळकुंडे जमिनीमध्ये समांतर वाढतात. अशावेळी दोन ओळींत शिफारस केल्याप्रमाणे पुरेसे अंतर ठेवावे. लागवड जमिनीच्या समांतर करावी.

लागवडीपूर्वी बेण्यास रासायनिक आणि जैविक बेणेप्रक्रिया अवश्य करावी. प्रथम रासायनिक बेणेप्रक्रिया करून नंतर जैविक बेणेप्रक्रिया करावी. कोणत्याही परिस्थितीत जैविक बेणेप्रक्रिया रासायनिक प्रक्रिये अगोदर करू नये. रासायनिक प्रक्रिया केल्यानंतर बियाणे सावलीमध्ये दोन ते तीन दिवस सुकवून नंतर जैविक बीजप्रक्रिया करावी.

खत व्यवस्थापन :हळद पिकांस सेंद्रिय खतांचा भरपूर पुरवठा केल्यास उत्पादन वाढीस मदत मिळते. त्यासाठी पूर्वमशागतीवेळी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ३५ ते ४० टन प्रमाणे चांगले मिसळावे. शेणखतामुळे गड्ड्यांची वाढ चांगली होते. पुरेसे शेणखत उपलब्ध नसल्यास, इतर सेंद्रिय निविष्ठांचा वापर करावा. हळद पिकास हेक्टरी २०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाश देण्याची शिफारस आहे. संपूर्ण स्फुरद आणि पालाश लागवडीवेळी, तर नत्राची मात्रा २ समान हप्त्यांत विभागून द्यावी. नत्राचा पहिला हप्ता (१०० किलो नत्र) लागवडीनंतर ४५ दिवसांनी द्यावे. त्यासोबत फेरस सल्फेट आणि झिंक सल्फेट प्रत्येकी १२ किलो द्यावे. नत्राचा दुसरा हप्ता म्हणजेच १०० किलो नत्र भरणीवेळी (लागवडीनंतर २.५ ते ३ महिन्यांनी) द्यावे.

पाणी व्यवस्थापन :हळद पिकास सुरुवातीच्या काळ हा मुळांना जमिनीत स्थिरता प्राप्त होण्याचा काळ असतो. या कालावधीत आंबवणीचे पाणी लगेच ४ ते ६ दिवसांच्या अंतराने द्यावे. हलक्या ते मध्यम जमिनीत पाण्याच्या १३ ते १५ पाळ्या द्याव्या लागतात. सिंचन कमी पडले तर कंदांची योग्य वाढ होत नाही.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### राष्ट्र सेवादल दिवस, हुतात्मा दिन, विश्व निष्पाप बालक व आक्रमणपीडित दिन

### महत्वाच्या घटना

१०३९ : हेन्री तिसरा पवित्र रोमन सम्राटपदी.
१६७४ : मराठा साम्राज्य राज्याभिषेकापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांची सुवर्णतुला झाली. ब्रिटिश वकिलातीच्या मते त्यांचे वजन सुमारे ७३ किलो भरले.
१७९२ : कॅप्टन जॉर्ज व्हॅनकूवरने प्युजेट साउंड हा अखात ग्रेट ब्रिटनच्या नावे जाहीर केला.
१७९४ : ब्रिटिश सैन्याने हैतीची राजधानी पोर्ट-औ-प्रिंस जिंकली.
१८०४ : आपल्या पत्नीच्या मृत्यूने व्यथित असलेल्या सार्डिनियाच्या राजा चार्ल्स इम्मॅन्युएल चौथ्याने पदत्याग केला. त्याचा भाऊ व्हिक्टर इम्मॅन्युएल राजेपदी.
१८६२ : अमेरिकन यादवी युद्ध दक्षिणेच्या सैन्याने फोर्ट पिलोतून पळ काढला. उत्तरेने मेम्फिस, टेनेसीवर चाल केली.
१८७६ : न्यू यॉर्कहून निघालेली ट्रान्सकॉंटिनेन्टल एक्सप्रेस ही रेल्वे गाडी ८३ तास ३९ मिनिटांच्या प्रवासानंतर सान फ्रांसिस्को येथे पोचली. अमेरिकेच्या दोन तीरांना जोडणारी ही रेल्वेची पहिली प्रवासी खेप होती.
१८७८ : ऑट्टोमन साम्राज्याने सायप्रस युनायटेड किंग्डमच्या हवाली केले.
१८९६ : हेन्री फोर्ड यांनी तयार केलेल्या पहिल्या मोटारीचे यशस्वी परीक्षण.
१९१२ : मॅसेच्युसेट्स कामगारांचा लघुत्तम पगार ठरवणारे पहिले अमेरिक राज्य झाले.
१९२० : ट्रायानॉनचा तह.
१९२८ : तैवानच्या राष्ट्राध्यक्ष झ्हॉंग झुओलिनची हत्या.
१९२९ : अमेरिकन उद्योगपती व ईस्टमेन कोडक कंपनीची संस्थापक जॉर्ज ईस्टमैन यांनी पहिल्या रंगीत चित्रपटाचा नमुना सादर केला.
१९३९ : ज्यूंचे शिरकाण युरोपमधून ९६३ ज्यूंना घेउन आलेल्या एस.एस. सेंट लुईस या बोटीला अमेरिकेने परवानगी नाकारली. यापूर्वी क्युबानेही हे प्रवासी स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे ही बोट युरोपला परतली. यातील अनेक प्रवासी नाझींच्या छळसत्रात मृत्यू पावले.
१९४० : दुसरे महायुद्ध जर्मन सैन्य पॅरिसमध्ये घुसले.
१९४२ : दुसरे महायुद्ध-मिडवेची लढाई सुरू.
१९४३ : आर्जेन्टिनामध्ये लश्करी उठाव, रमोन कॅस्टियोची हकालपट्टी.
१९४४ : अमेरिकेच्या हंटर किलर प्रकारच्या पाणबुड्यांनी जर्मनीची यु-५०५ ही पाणबुडी पकडली.
१९४४ : दुसरे महायुद्ध दोस्त सैन्याने रोम जिंकले.
१९५९ : भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार मिळविणारे पहिले भारतीय नागरिक सी राजगोपालचारी यांनी स्वतंत्र पक्षाची स्थापना केली.
१९६७ : ब्रिटिश मिडलँड विमान कंपनीचे विमान कोसळले. ७२ ठार.
१९७० : टोंगाला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
१९७९ : घानामध्ये लश्करी उठाव.
१९८९ : आयातोल्ला रुहोल्लाह खोमेनीच्या मृत्यूनंतर आयातोल्ला अली खामेनेई इराणच्या नेतेपदी.
१९९३ : आय.एन. एस. म्हैसूर या युद्धविनाशिकेचे जलावतरण.
१९९४ : मजरुह सुलतानपुरी यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर.
१९९४ : वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटु ब्रायन लारा याने आठ डावात सात शतके ठोकून नवा विक्रम प्रस्थापित केला.
१९९७ : इन्सॅट-२डी या संपूर्ण भारतीय बनावटीच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण झाले.
१९९७ : नासाचे मार्स पाथफाइंडर प्रोब मंगळावर उतरले.
२००१ : नेपाळचा शेवटचा राजा ग्यानेंद्र राज्यपदावर.
२००८ : हरियाणा राज्य सरकारकडून २५ वर्षांखालील मुलींना कौटुंबिक पेन्शनचा लाभ जाहीर करण्यात आला.
२०१० : स्पेसएक्स फाल्कन ९ रॉकेट पहिले उड्डाण.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३८ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (तिसरा) यांचा जन्म. (मृत्यू: २९ जानेवारी १८२०)
१९०४ : भगत पूरण सिंग भारतीय प्रकाशक, पर्यावरणवादी आणि परोपकारी पद्मश्री (निधन: ५ ऑगस्ट १९९२)
१९१० : होव्हर्क्राफ्ट चे शोधक ख्रिस्तोफर कॉकेरेल्म यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १९९९)
१९१५ : माली देशाचे पहिले अध्यक्ष मालिबो केएटा यांचा जन्म. (मृत्यू: १६ मे १९७७)
१९१६ : रॉबर्ट एफ. फर्चगॉट अमेरिकन बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक नोबेल पारितोषिक (निधन: १९ मे २००९)
१९३१ : साली भारतीय रंगहीन हिंदी चित्रपट क्षेत्रांतील प्रसिद्ध अभिनेत्या बिना राय यांचा जन्मदिन.
१९३६ : चित्रपट अभिनेत्री नूतन बहल यांचा जन्म. (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९९१)
१९४६ : एस. पी. बालसुब्रह्मण्यम चित्रपट पार्श्वगायक पद्म भूषण, पद्मश्री (निधन: २५ सप्टेंबर २०२०)
१९४७ : अशोक सराफ, लोकप्रिय मराठी अभिनेते.
१९७४ : भारतीय शेफ जॅकब सहाय्या कुमार अरुनी यांचा जन्म. (मृत्यू: ४ नोव्हेंबर २०१२)
१९७५ : अमेरिकन अभिनेत्री अँजेलिना जोली यांचा जन्म.
१९९० : जेत्सुन पेमा वांग्चुक, भूतानाची राणी.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१८ : प्रख्यात महाराष्ट्रीयन मराठी भाषिक कवी व भाषांतरकार रावसाहेब गोविंद वासुदेव कानिटकर यांचे निधन.
१९४७ : धर्मानंद दामोदर कोसंबी, बौद्ध धर्माभ्यासक, पंडित. (जन्म: ९ ऑक्टोबर १८७६)
१९६२ : चार्ल्स विल्यम बीब (चित्रित), अमेरिकन निसर्गतज्ज्ञ.
१९९८ : डॉ. अश्विन दासगुप्ता, इतिहासतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ.
१९९८ : गोविंद वासुदेव कानिटकर, मराठी साहित्यिक.
२०१४ : अमेरिकन बेसबॉल खेळाडू, व्यवस्थापक आणि मेजर लीग बेसबॉल (एमएलबी) चे प्रशिक्षक डॉन झिम्मर यांचे निधन.
२०१५ : सकू सुप्रसिद्ध अमेरिकन विन्स्टन चषक मालिका कार रेस ड्रायव्हर जबे थॉमस यांचे निधन.
२०२० : बासु चटर्जी (भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखक, जन्म: १० जानेवारी १९३०).

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
गुरूवार दि.४ जून २०२६
५

# दिव्यांग पत्रकार राहुल मुळे यांना पाच तास डांबून अमानुष मारहाण

## आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करा;पत्रकारांची मागणी

जालना। प्रतिनिधी

जालना येथील 'दिव्यांग वार्ता'चे संपादक तथा पत्रकार राहुल मुळे यांना पाच तास बेकायदेशीरपणे एका खोलीत डांबून ठेवत अमानुष मारहाण करण्यात आल्याच्या घटनेमुळे पत्रकार क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील आरोपींवर तात्काळ गुन्हा दाखल करून पत्रकार संरक्षण कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पत्रकार, विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यांकडे दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पत्रकार राहुल मुळे हे काही दिवसांपूर्वी राजूर रोड परिसरातील तांदुळवाडी शिवारातील एका वॉटर पार्क परिसरात गेले होते. त्या परिसरासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांचा राग मनात धरून काही व्यक्तींनी त्यांना जबरदस्तीने पकडून बेदम मारहाण केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, राहुल मुळे यांना काठ्या, लाठ्या तसेच पाईपने मारहाण करण्यात आली. त्यांना दुपारी सुमारे २ वाजल्यापासून रात्री ८ वाजेपर्यंत एका छोट्या खोलीत डांबून ठेवण्यात आले व बाहेर जाऊ देण्यात आले नाही. हा प्रकार बेकायदेशीर कैद व मानवी हक्कांचे उल्लंघन असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे राहुल मुळे हे दिव्यांग असून त्यांच्या दिव्यांग पायावर तसेच डोळ्यांजवळ मारहाण करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. यावेळी ''लंगड्या'' अशा अवमानकारक शब्दांचा वापर करून त्यांचा अपमान करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.



त्यामुळे ही घटना केवळ मारहाणीपुरती मर्यादित नसून दिव्यांग व्यक्तीच्या सन्मानावर झालेला गंभीर आघात असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. मारहाणीनंतर राहुल मुळे यांच्याकडून दबावाखाली एका बॉण्डवर स्वाक्षरी करून घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच त्यांचा मोबाईल ताब्यात घेऊन त्यांच्या नावाने व्हॉट्सअॅप चॅटिंग करण्यात आल्याचाही गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. भविष्यात संबंधितांविरोधात बातमी प्रसिद्ध केल्यास परिणाम भोगावे लागतील, अशा प्रकारच्या धमक्या देण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या मारहाणीमुळे राहुल मुळे यांची प्रकृती बिघडली असून त्यांच्यावर शहरातील ओजस हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. घटनेमुळे पत्रकार वर्तुळात तीव्र नाराजी व्यक्त होत असून दोषींना तातडीने अटक करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. निवेदनात आणखी एक गंभीर आरोप करण्यात आला आहे. राहुल मुळे यांनी दिलेल्या तक्रारीनंतर संबंधित व्यक्तींनी त्यांच्याविरोधात खंडणीसारखे खोटे गुन्हे दाखल केल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून खोट्या तक्रारी व गुन्ह्यांबाबतही संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर पत्रकार संरक्षण कायदा, अपहरण, बेकायदेशीर कैद, मारहाण, धमकी आणि दिव्यांग व्यक्तीचा अपमान यासंबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या प्रकरणात तात्काळ आणि निष्पक्ष कारवाई न झाल्यास लक्षवेधी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## गोपिनाथ मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त खरवंडी कासार येथे सर्व रोगनिदान आरोग्य शिबीर

### देवनाथ फाउंडेशन पुरस्कृत एक तपापासून भटक्यांच्या पंढरीत आरोग्य सेवेचा जागर!



पाथर्डी । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या बाराव्या स्मृतीदिनानिमित्त खरवंडी कासार ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा यांच्या समाधीच्या पायथ्याशी असलेल्या लमानतांडा येथे उपेक्षित वंचित पीडित उपेक्षित कष्टकरी शेतकरी असंघटित ऊसतोड मजूर कामगारांच्या घटकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले देवनाथ फाऊंडेशन व आरोग्यदीप मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने हे सेवाकार्य पार पडले देवनाथ फाउंडेशनचे अध्यक्ष व भाजपा वैद्यकीय आघाडीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर दराडे यांच्या नेतृत्वाखाली ऊसतोडणी मजूर व वाहतूक कामगारांच्या आरोग्य संरक्षण संवर्धन आणि प्रबोधनासाठी गेली बारा वर्षे सातत्याने राबविले जाणारे हे शिबिर गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतीला उजाळा देण्याचा उपक्रम ठरले आहे शिबिरात पाथर्डी येथील आरोग्यदीप मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक हृदयरोगतज्ज्ञ डॉ.अभिजीत पवार यांनी विशेष मार्गदर्शन केले एकूण ११३ रुग्णांची तपासणी करून गरजूंना मोफत औषधे देण्यात आली कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करत उपस्थित मुंडे समर्थकांनी अभिवादन केले सालसिद्ध देवस्थानचे महंत ह.भ.प.हनुमंत महाराज शास्त्री यांनी मनोगत व्यक्त करताना पुरोगामी महाराष्ट्र हरितक्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक संघर्षयोद्धा माजी केंद्रीय मंत्री बबनराव ढाकणे आणि लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या समाजोपयोगी कार्यांच्या आठवणी सांगताना उपस्थितांना वेगळीच ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली यावेळी विजय राठोड दिलीप राठोड साहेबराव राठोड बाळासाहेब राऊत अशोक खेडकर मयूर काळुसे महादेव जगताप अनिल जवरे रमेश अंदुरे पोपट जवरे भास्कर राठोड कपिल बांगर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

### ऊसतोडणी कामगारांच्या आरोग्य प्रश्नासाठी कृतीशील लढा लढतोय: डॉ.ज्ञानेश्वर दराडे

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आणि ज्येष्ठ नेते प्रताप ढाकणे यांच्या नेतृत्वातून भटक्यांच्या पंढरी व लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे श्रद्धास्थान असलेल्या भगवानबाबांच्या कर्मभूमीत कष्टकरी शेतकरी वंचित पीडित ऊसतोडणी कामगारांची आरोग्य दूत सेवा हीच गोपीनाथ मुंडे यांना खरी श्रद्धांजली ठरेल आणि याची फलस्मृती एक कार्यकर्ता म्हणून निश्चित मिळाल्याशिवाय राहणार नाही.

## उपवर्गीकरणाच्या विरोधात महामोर्चा ; विविध मागण्यांचे तहसील प्रशासनाला निवेदन

मंठा। प्रतिनिधी

अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात ता. ३ रोजी दुपारी आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने मंठा शहरात भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले. आंबेडकरी कार्यकर्त्यांनी या मोर्चात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जोरदार घोषणाबाजी केली. शहरातील शासकीय विश्रामगृहापासून मोर्चाला सुरुवात झाली. विविध मागण्यांचे फलक आणि '' उपवर्गीकरण हटवा, आरक्षण वाचवा ''च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. शहरातील प्रमुख




मार्गांवरून मार्गक्रमण करत मोर्चाचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित जाहीर सभेने झाला.

सभेत विविध मान्यवरांनी अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाला तीव्र विरोध दर्शवत आपली मनोगते व्यक्त केली. यानंतर नायब तहसीलदार डी. डी. कुलकर्णी यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.निवेदनातील प्रमुख मागण्या : एससी आरक्षणातील (अ, ब, क, ड) उपवर्गीकरण रद्द करावे. पदोन्नतीतील आरक्षण तात्काळ लागू करावे.

शासकीय सेवांमधील अनुशेष भरती तातडीने पूर्ण करावी.जातीनिहाय जनगणना करण्यात यावी. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करावा. राखीव प्रवर्गातील गुणवंत उमेदवारांना खुल्या प्रवर्गात न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे.

या सर्व मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला. यावेळी कृती समितीचे पदाधिकारी उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, नगरसेवक राजेश खंदारे, बाळासाहेब अंभिरे, अशोक अवचार, शरद मोरे, गौतम सदावर्ते, दत्तप्रसाद बनसोडे, महादेव वाघमारे, दादाराव हिवाळे, अंबादास घायाळ, सुरेश वाव्हळे, आसाराम चोरमारे, विजेश वाघमारे, राजाराम चव्हाण, भिमराव वाघ यांच्यासह हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

## जनसामान्यांचा आवाज बुलंद करणारे नेतृत्व म्हणजे स्व.मुंडे साहेब–भास्कर दानवे



जालना। प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालना महानगर भाजपाच्या वतीने स्व. गोपीनाथराव मुंडे चौक येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे, नारायण पवार, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, मंडळ अध्यक्ष, सुनील खरे, संजय डोंगरे, नगरसेवक अर्जुन गेही, शशिकांत घुगे, विष्णू डोंगरे, राजेश जोशी, अनिरुद्ध पांजगे, नगरसेवक कल्याण भदनेकर, जिवन सले, अजित मानधनी, गौरव गोधेकर आदींची उपस्थिती होती. जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी सामान्य कार्यकर्त्याला पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याची त्यांची तळमळ आणि जनसामान्यांशी असलेली नाळ ही आजही कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार आणि कार्यपद्धती आत्मसात करून समाजसेवा करण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा.

मुंडे साहेबांनी राज्यातील आणि देशातील राजकारणात सामान्य माणसाचा आवाज बुलंद केला. त्यांच्या संघर्षमय जीवनातून कार्यकर्त्यांनी संघटन बांधणी, जनसंपर्क आणि समाजकारणाचे धडे घ्यावेत असे हि त्यांनी सांगितले.

## ऊसतोड मजुराचा मुलगा सचिन पाखरे झाला जलसंधारण खात्यात अधिकारी

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील पिंपळगव्हाण येथील ऊसतोड कामगार व दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक असलेले बाळासाहेब पाखरे यांचे चिरंजीव सचिन बाळासाहेब पाखरे यांची नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून जलसंधारण खात्यात निवड झाली आहे अपार जिद्द मेहनत कष्ट स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून सचिन पाखरे यांनी हे यश प्राप्त केले आहे सोलापूर जिल्ह्यात ते जलसंधारण खात्यात अधिकारी म्हणून रुजू होणार आहेत सचिन पाखरे यांच्या निवडीबद्दल पाथर्डी तालुक्यातील कष्टकरी वंचित शोषित ऊसतोड मजूर पालक तसेच विविध शासकीय



एमपीएससी व यूपीएससी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या सहकारी विद्यार्थ्यांकडून कौतुक करण्यात येत आहे.

## शेतकरी आंदोलनातील १६ वर्षांपूर्वीच्या गुन्ह्याचा गुरुवारी निकाल क्रांतिकारी ठरेल – संजय बडे

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील येळी परिसरातील शेतकऱ्यांच्या वीजप्रश्नी झालेल्या ऐतिहासिक आंदोलनानंतर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचा निकाल उद्या अहिल्यानगर येथील सत्र न्यायालयात जाहीर होणार आहे तब्बल १६ वर्षांपासून सुरू



असलेल्या या प्रकरणाच्या निकालाकडे येळीसह परिसरातील शेतकरी ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे १६ वर्षांपूर्वी येळी सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या अनेक गावांचा कृषी वीजपुरवठा थकीत वीजबिलांच्या कारणास्तव बंद करण्यात आला होता त्यावेळी शेतकऱ्यांची पिके जोमात असूनही सलग सात दिवस वीजपुरवठा खंडित राहिल्याने पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली होती यावेळी शेतकरी नेते संजय बडे यांच्या नेतृत्वाखाली येळी परिसरातील हजारो शेतकरी एकत्र आले आणि येळी सबस्टेशनवर भव्य मोर्चा काढून वीजपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी केली आंदोलनाच्या व आक्रमक आंदोलकांच्या दबावामुळे महावितरण प्रशासनाला वीजपुरवठा सुरू करावा लागल्याचा दावा आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येतो मात्र आंदोलनानंतर महावितरण प्रशासनाने आंदोलनकर्त्यांवर येळी सबस्टेशनच्या मालमत्तेचे नुकसान सरकारी कामात अडथळा आणि इतर विविध आरोपांखाली गुन्हे दाखल केले या प्रकरणात संजय बडे स्व.सोमनाथ खेडकर भगवानराव आव्हाड यांच्यासह अन्य आंदोलनकर्त्यांना आरोपी करण्यात आले होते या खटल्याची सुनावणी गेल्या १६ वर्षांपासून अहिल्यानगर सत्र न्यायालयात सुरू होती आरोपींच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. गोरक्षनाथ पालवे यांनी बाजू मांडली तर सरकार पक्षातर्फे अॅड मुसळे यांनी कामकाज पाहिले गुरुवारी दिनांक ४ जून २०२६ रोजी या बहुचर्चित प्रकरणाचा निकाल जाहीर होणार असून शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी उभारलेल्या आंदोलनाला न्याय मिळणार का याकडे संपूर्ण पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे या निकालामुळे केवळ आंदोलनकर्त्यांचेच नव्हे तर शेतकरी चळवळीच्या इतिहासातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा शेवट होणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

### टीसी हरवला आहे

शुभम शिवाजी शेंबडे या नावाचा इयत्ता बारावी पासचा टीसी चकलांबा ते शेकटा प्रवासा दरम्यान हरवला आहे. सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा

संपर्क

९०२२३९२६६८

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना भाऊसाहेब घुगेंनी वाहिली आदरांजली



जालना। प्रतिनिधी

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त परळी वैजनाथ येथील त्यांच्या स्मृतीस्थळावर शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली.

यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव खेडकर (मामा), देऊळगाव राजा येथील भाजप नेते डॉ. सुनील कायंदे, रामेश्वर दराडे, देवा ढाकणे, उद्धव गीते, दिनकर बारगजे, सुहास मुंडे, एकनाथराव जायभाये, नितीन कायंदे, राहुल चाटे, दीपक कायंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी केलेला संघर्ष, ग्रामीण भागाच्या विकासासाठी दिलेले योगदान, तसेच समाजहितासाठी केलेल्या कार्याचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण केली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
गुरूवार दि.०४ जून २०२६ | ६

# संघर्षातून जनमाणसांत रुजलेले नेतृत्व

# शिवसैनिक अनिलदादा



**बीड जिल्ह्याच्या राजकारणात अनेक चेहरे येतात आणि जातात, परंतु जनतेच्या सुख-दुःखात कायम धावून जाणारा आणि पक्षाशी एकनिष्ठ राहणारा कार्यकर्ताच खऱ्या अर्थाने लोकांच्या मनावर राज्य करतो. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप हे याच धाटणीचे नेते आहेत. आज त्यांचा वाढदिवस! त्यानिमित्ताने त्यांच्या विद्यार्थी दशेपासून सुरू झालेल्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाचा हा धावता आढावा.**







**विद्यार्थी दशेपासून धगधगते शिवसेना रक्त**

अनिलदादांचा शिवसेनेसोबतचा प्रवास काल-परवाचा नाही. त्यांची नाळ विद्यार्थी दशेपासूनच शिवसेनेशी आणि भगव्याशी जोडली गेली आहे. कॉलेज जीवनापासूनच अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवणे यातून त्यांच्यातील नेतृत्वाची ठिणगी पडली. गेली अनेक वर्षे ते शिवसेनेशी अत्यंत एकनिष्ठ राहिले आहेत. पक्षातील अनेक चढ-उतार त्यांनी जवळून पाहिले, पण भगवा झेंडा आणि शिवसेनेचा विचार त्यांनी कधीही सोडला नाही.

**सर्वसमावेशक मित्रपरिवार आणि मुस्लिम युवकांची मोठी साथ**

नावाप्रमाणेच ते सर्वांचे लाडके दादा आहेत. त्यांचा मित्रपरिवार केवळ मोठाच नाही, तर तो सर्वपक्षीय आणि सर्वधर्मीय आहे. समाजातील प्रत्येक घटकात दादांना मानणारा वर्ग आहे. विशेषतः मुस्लिम समाजातील तरुण वर्ग अनिलदादांच्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभा राहतो. सर्व धर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालण्याची त्यांची वृत्ती आणि धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन यामुळेच ते खऱ्या अर्थाने जनतेचे दादा बनले आहेत.

**संकट काळात धावून जाणारा देवदूत**

कोरोनाचा भयावह काळ असो किंवा बीड जिल्ह्याला पाचवीला पूजलेली दुष्काळी परिस्थिती, अनिलदादा कधीही घरात बसून राहिले नाहीत. जनतेला रेशन वाटप असो, रुग्णांना बेड आणि औषधोपचार मिळवून देणे असो किंवा दुष्काळात शेतकऱ्यांना धीर देणे असोदादांनी स्वतःला सामाजिक कार्यात वाहून घेतले. त्यांच्या याच संवेदनशीलतेमुळे लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल आदराचे स्थान आहे.

**कुटुंबाची खंबीर साथ आणि पत्रकारांशी आपुलकीचे संबंध**

कोणत्याही नेत्याच्या यशामागे त्याच्या कुटुंबाचा मोठा वाटा असतो. अनिलदादांना देखील त्यांच्या पत्नी, दोन भाऊ आणि मुलगा यांची प्रत्येक चांगल्या-वाईट काळात अत्यंत खंबीर साथ लाभली. कुटुंब पाठीशी असल्यानेच ते समाजासाठी मुक्तहस्ते काम करू शकले. यासोबतच, बीड जिल्ह्यातील पत्रकार बांधवांशीही दादांचे अत्यंत जिव्हाळ्याचे आणि आदराचे संबंध आहेत. मीडियाशी संवाद साधतानाची त्यांची नम्रता नेहमीच वाखाणण्याजोगी असते.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू शिलेदार**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे अत्यंत विश्वासू आणि कडवट शिलेदार म्हणून अनिलदादा जगताप यांची ओळख आहे. शिंदे साहेबांचा सर्वसामान्यांचे सरकार हा विचार बीड जिल्ह्याच्या घराघरात पोहोचवण्याचे काम दादा अत्यंत प्रामाणिकपणे करत आहेत.

अशा या सर्वांना आपलेसे वाटणाऱ्या, बीड जिल्ह्याच्या स्वाभिमानी आणि कडवट शिवसैनिकाला, श्री. अनिलदादा जगताप यांना वाढदिवसाच्या आणि पुढील राजकीय व सामाजिक प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

## पराभवाने न खचणारा झुंजार नेता

मागील काळामध्ये अनिलदादांना विधानसभेची उमेदवारी मिळाली. राजकारणातील गणिते आणि परिस्थितीमुळे त्या ठिकाणी त्यांना अपयश आले. परंतु, अनिलदादा हे पराभवाने खचून जाणाऱ्या नेत्यांपैकी नाहीत. पराभव ही शेवटी यशाची पहिली पायरी असते हे मानून त्यांनी दुसऱ्याच दिवसापासून दुप्पट जोमाने पक्षकार्य सुरू केले. बीड जिल्ह्यात शिवसेना एकनाथ शिंदे गटाची पाळेमुळे अधिक घट्ट करण्यासाठी त्यांनी अहोरात्र कष्ट उपसले आहेत.

## राजकारणासोबतच क्रीडा सांस्कृतिक क्षेत्रात योगदान

अनिल दादा जगताप राजकारणात असले तरी राजकारणात सोबतच ते एक खेळाडू आहेत क्रिकेटमध्ये त्यांचे नाव लौकिक आहे आदर्श क्रिकेट क्लब हा त्यांनी स्थापन केला होता या क्लबमधून अनेक खेळाडू घडले आहेत आज सचिन धस सारखा खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळत आहे एवढेच काय पण क्रीडा बरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे योगदान आहे चंपावती महोत्सव हा सांस्कृतिक कार्यक्रम बीड जिल्ह्यात नावारूपास आणला गेला यातही दादांचे मोठे योगदान असते

# गेवराई तहसीलदाराकडून जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या आदेशाला केराची टोपली

**घरकुलधारकाच्या वाळूवर महसूल आणि सेतू केंद्राची मोठी डील; कारवाईची मागणी**

गेवराई । प्रतिनिधी

राज्य शासनाने घरकुलधारकांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेतला त्याची अंमलबजावणी सुरू झाली मात्र गेवराई तालुक्यामध्ये तहसीलदार यांची मनमानी मोठ्या प्रमाणात सुरू असून जिल्हाधिकाऱ्यांच्या या मोफत वाळूच्या आदेशाला ते जुमानत नसल्याचे दिसून येते महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी तलाठी आणि सेतू केंद्र चालकाशी मोठी डील करून हीच वाळू सगळ्या भावाने खुलेआम विक्री केली जात आहे.

गोदावरी पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैद्यरीत्या अभ्यास मार्ग रात्रंदिवस सुरू आहे याला गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांची मुखसंती असल्याचे बोलले जात आहे प्रत्येकाचा हिस्सा ठरला असल्यामुळे ते देखील कारवाई करत नाहीत विशेषता दोन दिवसापूर्वीच सेतू केंद्र चालक पठाण नामक व्यक्तीने घरकुलासाठी आलेली मोफत पाच ब्रास वाळू घरकुल धारकांना व त्यांची दिशाभूल करत ओटीपी घेत ही वाळू वाळू माफियांना विकली गेली तालुक्यामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात घरकुलांसाठी वाळू मंजूर झालेली असतानाही तहसीलदार सेतू सेवा केंद्र चालक मंडळ अधिकारी तलाठी यांच्या संगनमताने हा सर्व गैरप्रकार सुरू आहे जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशालाही ही मंडळी जुमानत नसून गेवराईचे तहसीलदारच जिल्हाधिकारी असल्याच्या अविर्भावात वावरत असल्याचे दिसत ◀◀ पान ३ वर




# मुख्याध्यापक श्रीराम कुऱ्हे यांचा सेवागौरव समारंभ संपन्न

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील वडगांव हायस्कूल, वडगांव (गुंधा) या शाळेचे मुख्याध्यापक श्रीराम कुऱ्हे हे ३२ वर्षांच्या प्रदिर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार दि.३१ मे रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सेवागौरव सन्मान सोहळा संपन्न झाला.

जैन भवन, बीड येथे मुख्याध्यापक श्रीराम गंगाधर कुऱ्हे यांचा सेवागौरव सोहळा नुकताच आयोजित करण्यात आला. याप्रसंगी ह.भ.प.ओंकार महाराज वाघमारे, डॉ.योगेश क्षीरसागर, नगरसेवक शुभम धुत, राकेश जाधव, नागेश तांबारे, भारत ◀◀ पान ३ वर

# महिलेची फसवणूक झालेली संपूर्ण रक्कम केली हस्तगत; मुख्य आरोपीला चौसाळ्यातून अटक

बीड । प्रतिनिधी

मोबाईल आणि सिमकार्डचा गैरवापर करून एका महिलेच्या बँक खात्यातून तब्बल १,३३,९९५/- रुपयांची ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या मुख्य आरोपीला अटक करण्यात बीड सायबर पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी अत्यंत वेगाने तपास करत फसवणूक झालेली संपूर्ण रक्कम हस्तगत केली असून, मुख्य आरोपीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.




हिंगणी (ता. जि. बीड) येथील रहिवासी मिनाक्षी दत्ता आंधळे यांच्या मोबाईल व सिमकार्डचा वापर करून अज्ञात भामट्यांनी त्यांच्या बँक खात्यातून १,३३,९९५/- रुपये ऑनलाईन चोरले होते. याप्रकरणी बीड सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३१/२०२५, कलम ३१८(४), ३(५) बी.एन.एस. सह कलम ६६, ६६(क) आय.टी. अॅक्ट २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण ◀◀ पान ३ वर

# वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट ३० जुन पुर्वी बसविणे बंधनकारक

बीड । प्रतिनिधी

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० नुसार राज्यातील सर्व शासकीय आणि खाजगी वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. या संदर्भात प्रशासनाकडून अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली असून, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना दि. ३० जून २०२६ पर्यंत ही नंबर प्लेट बसवणे बंधनकारक आहे. अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बालाजी धनवे यांनी दिली आहे.

केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या ६ डिसेंबर २०१८ रोजीच्या राजपत्रानुसार, १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट इन-बिल्ट म्हणजेच कंपनीकडूनच बसवून देणे अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, आता १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व खाजगी तसेच शासकीय वाहनांनाही ही नंबर प्लेट बसवण्यासाठी दि. ३० जून २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे.

या नियमाच्या पार्श्वभूमीवर, सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांना विशेष पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे. आपल्या कार्यालयाच्या अभिलेखावर नोंद असलेल्या आणि १ एप्रिल २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या सर्व शासकीय वाहनांना विहित मुदतीत म्हणजेच दि. ३० जून २०२६ पूर्वी उच्च श्रेणी नोंदणी पाटी बसवून घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. मुदतीपूर्वी हे काम पूर्ण झाल्यास या संदर्भातील अहवाल वरिष्ठ कार्यालयाला सादर करणे सोयीचे होईल, असेही उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# रस्ते कामात भ्रष्टाचार; प्रशासकीय अधिकाऱ्यांची बोगसगिरीकडे डोळेझाक

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात खडीकरणाच्या नावाखाली प्रचंड बोगस कामे सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शेतकऱ्यांच्या शेतमधून परवानगीशिवाय रस्ते काढणे, निकृष्ट दर्जाचे खडीकरण, ठेकेदारांना लुटण्याची मोकळी सूट आणि प्रशासनाचे मुकाट्याचे धोरण यामुळे संपूर्ण तालुक्यात संतापाचे वातावरण आहे.

शेतकरी आणि ग्रामस्थांनी खुलेआम सांगितले की, पाटोद्याचे प्रशासकीय अधिकारी बहिरे, लूळे आणि पांगळे झाले आहेत. त्यांना शेतकऱ्यांच्या वेदना ऐकू येत नाहीत, दिसत नाहीत आणि चालतही नाही.

अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांच्या मालकीच्या शेतजमिनीच्या मधून बळजबरीने रस्ते काढण्याचे प्रकार घडत आहेत. शेतकऱ्याची कोणतीही लेखी परवानगी न घेता, त्याला न कळवता बुलडोझर घालून रस्ता काढला जात आहे. यामुळे अनेक ठिकाणी शेतकरी-प्रशासन-ठेकेदार यांच्यात तणाव निर्माण झाला असून, काही गावांमध्ये मारामारीच्या घटनाही घडल्या आहेत.

एक शेतकरी म्हणाला, आमची पिढ्यान्पिढीची जमीन आहे. रस्ता काढायचा असेल तर बोलणी करा, नुकसानभरपाई द्या. पण हुकूमशाही चालणार नाही. आम्ही रक्त देत नाही तर कुणी रस्ता बांधू शकत नाही.

तहसीलदार, बीडीओ, सीईओ, कलेक्टर... सगळे मौन!

ग्रामस्थांनी प्रथम तहसीलदार आणि बीडीओ यांच्याकडे तक्रार केली. काहीही कारवाई झाली नाही. नंतर जिल्हा स्तरावरील वरिष्ठ अधिकारी, सीईओ आणि कलेक्टर यांच्याकडे तक्रारी देण्यात आल्या. तरीही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. यामुळे आता शेतकरी-ग्रामस्थांचा संताप शिगेला पोहोचला आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणतात, बोगस खडीकरणाच्या कामात प्रचंड भ्रष्टाचार चालला आहे. कमी खडी, निकृष्ट मटेरियल आणि जादा बिलिंग यातून लाखो रुपये लुटले जात आहेत. प्रशासनाने ठेकेदारांवर तात्काळ कारवाई करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित केले नाही तर आम्ही विभागीय आयुक्त कार्यालयासमोर मोर्चा ◀◀ पान ३ वर

# भाजपाच्या वतीने लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

माजलगाव । प्रतिनिधी

भाजपाच्या वतीने लोकनेते तथा मा केंद्रीय ग्रामविकास मंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भाजपाचे राज्य परिषद सदस्य अरुण राऊत,भाजपा नेते शिवाजी रांजवण, माजलगाव भाजपाचे शहर मंडळाचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी,कीट्टी आडगाव मंडळाच्या तालुकाध्यक्ष रूपाली कचरे , पात्रुड मंडळाचे डॉ अभिजीत सोळंके यांनी मुंडे यांच्या आठवणीला उजाळा देत त्यांनी केलेले कार्य याविषयी माहिती दिली.महाराष्ट्र मध्ये भारतीय जनता पार्टी ग्रामीण पातळीपासून ते शहर पातळीपर्यंत पक्ष वाढवण्याचे काम व कमळ फुलवण्याचे काम हे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांनी केले., सर्वसामान्य गोरगरीब वंचित व्यक्तींच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहून त्यांनी सर्वसामान्य व्यक्तीला न्याय देऊन मदत करण्याचे काम केले आणि त्यामुळेच त्यांना महाराष्ट्राचे अनाथांचे नाथ म्हणून म्हटले जाते. या अभिवादनाच्या कार्यक्रमास भाजपा नेते सत्यनारायण ऊनवणे अशोक शेजुळ माजलगाव भाजपाच्या शहर सचिव पूजा मुंडकर,युवा नेते शरद कचरे,अनंत जगताप,प्रदीप जाधव,मनोज कोरडे,रवी गायकवाड रवी वाकळे राजू सरवदे उपस्थित होते.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26